# माणूस



शनिवार । २७ मार्च १९७१ । चाळीस पैसे

## कोकण गांधी
## अप्पा पटवर्धन

शनिवार २७ मार्च १९७१

# माणूस

वर्ष : दहावे
अंक : त्र्यहात्तरावा

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मळा पुरंदरे

किंमत
चाळीस पैसे

वार्षिक वर्गणी
तीस रुपये

परदेशची वर्गणी
साठ रुपये

## सप्रेम नमस्कार....

□ नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांच्या संदर्भात "माणूस"चा एक चाहता म्हणून आपुलकीच्या भावनेने एका खटकलेल्या गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो. 'माझा जाहीरनामा' हे सदर फार आवडले. त्या सदरातील आपला हेतु योग्य वाटला. आपली कल्पकता आवडली.

मात्र निवडणुकांच्या धुमश्चक्रीत 'माणूस' ने आपला तोल ढळू न देण्याची खबरदारी घेतली नाही याचा विषाद वाटतो. 'माणूस'ची भूमिका राजकीय अभ्यासकाची असायला हवी होती. एक निःपक्षपाती मार्गदर्शक म्हणून 'माणूस' कार्यरत राहिला असता तर त्यामुळे 'माणूस'ची परंपरा जोपासली गेली असती. 'माणूस'ने राजकारण खेळायला नको होते. 'माणूस'ची मतप्रणाली मांडताना 'माणूस' सरळसरळ राजकीय आखाड्यात उतरला. नेमकी हीच गोष्ट 'माणूस' ला टाळता आली असती.

१६ मार्च, १९७१ — जयवंत वेरेकर, साखळी (गोवा)

द्विसाप्ताहिक माणूस १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

कोकण गांधी

# अप्पा पटवर्धन

दिनकर धोंडो परांजपे

खांद्यावर कावड घेतलेले अनेक लोक मुंबईला पाहावयाला मिळतात. पण त्या कावडीत दूध, भाजीपाला असे पदार्थ असतात. पण अप्पा पटवर्धनांना खांद्यावर कावड घेऊन जाताना पाच वर्षे मी पाहत होतो, ती कावड संडासातील मैल्याच्या डब्यांची असे. १९५३ साली भाग शिक्षणाधिकारी म्हणून माझी बदली कणकवली येथे झाली. पावसाळी चार महिने सोडले तर जवळच्या रस्त्याने गोपुरी ही कणकवलीपासून एक मैलाच्या आतच. त्यामुळे गोपुरीत जाणे गावात जाण्यासारखेच असे. गोपुरीत खतासाठी अप्पा कणकवलीतून मैला नेत. भंग्यांनीही मैल्याचे भांडे डोक्यावरून न नेता खांद्यावर कावड घेऊन शक्य तेथे हातगाडीनेच न्यावे असे अप्पांचे म्हणणे होते.

अप्पांसारखा एम. ए. झालेला, एका काळी प्राध्यापक असलेला माणूस निष्ठेने मैल्याची कावड वाहतो ही एकच गोष्ट अप्पांचा मोठेपणा लक्षात घेण्यास पुरेशी आहे. भंग्यांना संडाससफाईचे जे काम करावे लागते त्यातून त्यांची सुटका व्हावी आणि मलमूत्राचा उपयोग खतासाठी व्हावा म्हणून अप्पांनी आयुष्यभर अनेक प्रयोग केले. विविध प्रकारचे संडास तयार केले. मलाचे गॅसप्लॅन्टही उभारले. संडासांसाठी गावोगावच्या कुंभारांना तयार करता येतील अशी मातीची भांडी तयार करवली व ती खराब होऊ नयेत म्हणून त्यांवर लाखेचे पॉलिश चढवण्याचे प्रयोग गोपुरीत केले. त्यानंतर गोपुरी संडासांचा प्रसार करण्यासाठी श्री. तोडणकर गुरुजी यांना भंगीमुक्तिसंघटक म्हणून नेमले असून महाराष्ट्रभर त्यांचे काम चालू आहे. भारत सरकार व गांधी स्मारकनिधी यांतून आर्थिक साहाय्य अप्पांच्या या

कामाला मिळत आहे. शौचाच्या खताला सोनखत व लघवीच्या खताला हिराखत अशी नावे अप्पांनी दिली.

## राष्ट्राला वाहून घेतले

गरिबीतून शिष्यवृत्त्यांवर एम. ए. होऊन प्राध्यापक असलेले सीताराम पुरुषोत्तम ऊर्फ अप्पा पटवर्धन हे ५० वर्षांपूर्वी म. गांधींच्या कार्यक्रमांकडे ओढले गेले आणि त्यात एकरूप झाले. इतके की अप्पांना 'कोकणचे गांधी' हे नामाभिधान प्राप्त झाले. (आचरण इतके शुद्ध व ऋषितुल्य की लोकांनी त्यांच्या नावामागे पूज्य ही पदवी लावली.)

रत्नागिरी जिल्ह्यातील काँग्रेसची संघटना निर्माण करणारे अप्पा होत. १९४७ पर्यंत काँग्रेसचे पदाधिकारी कोणीही असले तरी सूत्रचालक अप्पा होते. स्वातंत्र्य चळवळीत रत्नागिरी जिल्ह्यातील शिरोड्याचा मिठाचा सत्याग्रह खूप गाजला. त्याचे सूत्रचालक अप्पाच होते. स्वातंत्र्य चळवळीत अप्पांना तुरुंगाची हवा अनेक वेळा खावी लागली. १९४२ च्या चळवळीत रत्नागिरी जिल्ह्यात मामलेदार कचेरी जाळणे, कलेक्टर कचेरीत स्फोट होणे, तारायंत्राच्या तारा तोडणे, पोस्टाच्या बॅगा लुटणे अशी विध्वंसक कृत्येही झाली. ही कृत्ये स्वातंत्र्याची तृष्णा लागलेल्या काँग्रेसच्या निर्भय स्वयंसेवकांनी केली. लोकांमध्ये निर्भयता निर्माण करण्याचे कार्य अप्पा करीत होते. पण असली विध्वंसक कृत्ये करण्याचे सूत्रचालकत्व मात्र अप्पांचे असल्याची वार्ता आतापर्यंत केव्हाही माझ्या कानी आलेली नाही. अप्पांचा पिंड विधायक कार्याचा होता. खादी उत्पादन आणि जिल्ह्यातील व बाहेरील खादी उत्पादनाची विक्री या कामी अप्पांनी अनेक वर्षे स्वतःला वाहून घेतले होते.

## गोपुरीची स्थापना

स्वतःचे निरनिराळे विचार कृतीत आणावयाला स्वतःची जागा पाहिजे हे ओळखून अप्पांनी कणकवलीजवळच्या नदीकाठच्या दक्षिणेकडील किनाऱ्यावरील माळावर गोपुरीची स्थापना केली; म्हणजे तेथे राहण्यासाठी व गुरांसाठी इमारती बांधल्या, पाण्यासाठी विहीर पाडली आणि भाजीपाला, फळे, भात वगैरे शेतीसाठी जमीन तयार केली. गोपुरीच्या या प्राथमिक उभारणीसाठी श्री. कोरगावकरांनी देणगी दिल्यामुळे अप्पांना आपले विचार कृतीत आणता आलें. अप्पांच्या या आश्रमात ब्राह्मणांपासून हरिजनांपर्यंत सर्व जातींचे लोक एकत्र जेवण तयार करतात आणि एकत्र जेवतात. काही स्वतंत्र बिऱ्हाडेही आहेत. गोपुरीत आंबे, फणस, नारळ, पपई, चिकू, केळी, पेरू वगैरे अनेक जातींच्या फळझाडांची लागवड आहे. परंतु कोकणात होणारे व भरपूर उत्पन्न देणारे सुपारीचे एकही झाड लावलेले आढळणार नाही. कारण अप्पांचे म्हणणे सुपारी ही जीवनाला आवश्यक वस्तू नव्हे. चैनीची वस्तू आहे. धान्यादी इतर पिकांचेही असेंच. देशावरील फळे अप्पांनी गोपुरीत

लावली. परंतु तंबाखू कोकणात होतो की नाही हे गोपुरीत चुकूनही पाहिले जाणार नाही; असे अप्पा म्हणत.

गोपुरीच्या स्थापनेपासून अनेक वर्षे तिच्यासाठी अप्पा झटले. या गोपुरीत चर्मोद्योग चालतो, एवढेच नव्हे तर अनेक विद्यार्थी चर्मोद्योगाचे शिक्षण घेऊन तयार होऊन गेले. चांगल्या गाई-बैलांचे उत्पादन व्हावे म्हणून पुष्कळ प्रयत्न झाले. गोपुरीत शेणाचा गॅस प्लॅन्ट आहे. बाराही महिने अल्प प्रमाणात हिरव्या चाऱ्याची सोय आहे, त्याचप्रमाणे हिरवा चारा साठविण्याचीही योजना आहे.

उत्कृष्ट भातशेती (अधिक पीक देणारी) हे तर गोपुरीचे वैशिष्टच आहे.

गोपुरी तयार झाल्यावर १९५३ साली नदीला अकल्पित पूर येऊन तिची बांध-बंदिस्ती वाहून गेली नि शेतीमध्ये दगडांचे ढीग पडले. जणू परमेश्वराने अप्पांची परीक्षा पाहिली ! या परीक्षेत अप्पा उतरले. पुन्हा अखंड परिश्रम व खर्च करून पुराच्या बहुतेक निशाण्या पुसून काढण्यात आल्या.

गोपुरीची उभारणी हे अप्पांनी केलेले मोठे कार्य आहे. गोपुरी पुष्कळांशी स्वयं-पूर्ण झालेली आहे. परंतु शोषणविरहिततेवर भर असल्याने काही खर्च तेथे वाढतात. यामुळे संपूर्ण स्वयंपूर्णता निर्माण करण्यास अडचणी आहेत. तरीही काही वर्षे गोपुरी स्वयंपूर्ण होते.

## सर्वोदयासाठी प्रयत्न

सफाई आणि गोपुरी याहूनही अधिक महत्त्वाचे कार्य अप्पांनी केले ते गरीब शेतकऱ्यांसाठी जमिनीचा खंड जाऊन शेतकऱ्याला फार थोडे उत्पन्न राहते. जमीन कसणारा हालात दिवस काढतो नि खंड घेणारा परिश्रम न करता शेतकऱ्यापेक्षा अधिक चांगल्या स्थितीत राहतो. त्याचप्रमाणे शेतकरी जे कर्ज घेतो त्या कर्जाचे व्याजच जबर असल्याने मुद्दल लवकर फिटत नाही आणि व्याजातच शेतकरी हैराण होतो. म्हणून खंड आणि व्याज या दोन्ही गोष्टी नाहीशा केल्याविना गरिबांची स्थिती सुधारणार नाही असे ठरवून अप्पांनी आयुष्यभर त्या दृष्टीने विचार व कार्य चालविले. काँग्रेस संघटना बांधीत असतानाच 'व्याजबट्टयाचा निषेध,' 'गावचे गोकुळ' अशा लेखांनी त्यांनी वैचारिक क्रांतीला चालना दिली तर काँग्रेस सरकारे आल्यावर कूळ कायदा आणि सावकारी नियंत्रण कायदा झाला. पिकाचा षष्ठांश मालकाला मिळाला. (एकाकाळी सरकारदस्त पिकावर ठरविला गेला हे गृहीत धरून त्या आधारे) असे ठरवून सरकारने कूळ कायद्याचे जे पहिले पाऊल टाकलें त्यामागे सरकारला अप्पांसारख्यांचीच सूचना होती आणि म्हणून त्या पावलाचे समर्थन अप्पांनी हिरीरीने चालविले होते. दुसरे पाऊल कुळ शब्दाची व्याख्या विस्तृत करून जमीन कसणाऱ्यांच्या हाती जास्तीत जास्त जमिनी राहतील अशी कायद्यात दुरुस्ती व तिसरे पाऊल नाममात्र किंमत देऊन मालकी हक्क

कुळांचे करणे अशा तीन पावलांत मालकरूपी बळीराजाचे राज्य कुळरूपी वामनाने व्यापले. त्रिपादभूमी मागणाऱ्या वामनाच्या बुद्धीचे जेवढे कौतुक तेवढेच अप्पांसारख्या कार्यकर्त्यांच्या प्रज्ञेने जे केले त्याचे कौतुक इतिहासाला करावे लागेल.

सावकारी व जमिनीसंबंधी सरकारचे कायदे होऊनही परिश्रम न करणारे सर्व लोक त्यात सापडत नाहीत असे पाहून अप्पांची विचारसरणी सुरूच राहिली. गोपुरीचे कार्य दुसऱ्यावर सोपवून अप्पा भूदान चळवळीत हिरीरीने पडले. परंतु भूदानानेही सर्व प्रश्न सुटणार नाहीत असे लक्षात आल्यावर चलनशुद्धीची कल्पना अप्पांच्या डोक्यातून निघाली आणि तिचा पाठपुरावा गेली दहा वर्षे ते हिरीरीने करीत आहेत. चलनशुद्धीच्या कल्पनेत माणसाजवळील पैसारूपी कागदी संपत्ती प्रतिवर्षी ठराविक प्रमाणांत घटविणे हा मुख्य मुद्दा आहे. (कागदी संपत्ती म्हणण्याचे कारण या संपत्तीचे सोने, चांदी देण्याचे बंधन आता रिझर्व्ह बँकेने व सरकारनेही झुगारून दिलेले आहे.) अप्पांच्या योजनेत कागदी नोटेची किंमत दरमहा घसरविण्याची कल्पना असल्याने सर्वत्र आर्थिक वातावरण अस्थिर व गुंतागुंतीचे होईल असे पुष्कळांना वाटते. त्यामुळे गेली दहा वर्षे अप्पांनी चलनशुद्धीसाठी सतत पदयात्रा करून चार हजारावर व्याख्याने दिली असतील, तरीही चलनशुद्धीच्या विचारांनी अद्याप फारसे मूळ धरले नसावे. तरीही समाजवादाचा व काळ्या बाजाराने बरबटणारे वातावरण शुद्ध करण्याचा विचार करणाऱ्या भारत सरकारला अप्पांच्या चलनशुद्धीतील एक कल्पना केव्हातरी उचलावीच लागेल. ती कल्पना म्हणजे ठराविक मुदतीने जुन्या सर्व नोटा रद्द करून त्याऐवजी नव्या नोटा देणे. त्यायोगे घराघरांतून शिल्लक ठेवलेल्या नोटा बदलण्यासाठी तरी बाहेर येतील आणि खोट्या नोटा चलनात किती घुसल्या आहेत याची कल्पना सरकारला येईल.

## सर्वोदय छात्रालय

कै. बाळासाहेब खेरांनी केलेल्या ट्रस्टचे प्रमुख ट्रस्टी अप्पासाहेब होते. त्यातून अप्पांनी उभारलेले सर्वोदय छात्रालय आतापर्यंत चांगल्या रीतीने चाललेले आहे. या छात्रालयात सफाई, जेवण करणे, पूर्णान्नासाठी पाळीपाळीने दळण ही कामे मुले स्वतःच करतात. सध्या श्री. मोरोपंत जोशी छात्रालयाचे काम पाहतात.

१९४७ च्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारने प्रत्येक जिल्ह्यात सर्वोदय योजना म्हणून एकेक विकास केंद्र निर्माण केले होते. रत्नागिरी जिल्ह्यातील केंद्र अप्पांच्या संचालकत्वाखाली होते. परंतु कोठेही आपण चिकटून राहावयाचे नाही या धोरणाप्रमाणे अप्पांनी ते केंद्र कै. तात्यासाहेब करमळकर यांच्या गळयात घातले होते. गोमुक्तीकडे तोडणकर गुरुजी तर गोपुरीकडे भाई बागल, चलनशुद्धीकडे वा. ल. साठे तर सर्वोदय छात्रालय नवकोकण यांकडे मोरोपंत जोशी अशा लायक माणसांच्या हाती अप्पांनी आपली कार्ये सोपविली आहेत.

## अप्पांचा आजार

तसे म्हटले तर गेली २–३ वर्षे त्यांना बोलताना त्रास होत असे. पण ही गोष्ट जास्त त्रास होऊ लागल्यावर गेल्या डिसेंबरात अप्पा बोलले.

७ डिसेंबरच्या सुमारास अप्पांना सावंतवाडीच्या डॉ. आचवलांनी गोपुरीत जाऊन तपासले आणि श्री. मोरोपंत जोशी यांजवळ बोलताना होणारा त्रास तीन गोष्टींनी होणे शक्य असल्याचे सुचविले : (१) साधा किरकोळ त्रास, (२) टी. बी., (३) कॅन्सर. म्हणून तपासणी करून घेण्याचा सल्ला अप्पांना देण्यास सांगितले. श्री. मोरोपंत जोशींनी अप्पांना प्रकृती तपासून घेण्याचा सल्ला दिला, पण यासाठी मुंबईस तातडीने जाण्याची आवश्यकता अप्पांना वाटली नाही. नंतर चलनशुद्धीच्या सभेच्या कामासाठी अप्पा रत्नागिरीस गेले असता डॉ. रमेश चव्हाण एम. एस. यांनी एक्सरे घेऊन टी. बी. चे निदान केले व संपूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला. तेव्हापासून अप्पांनी बोलणे बंद केले आणि संपूर्ण विश्रांती सुरु केली. जानेवारीअखेर विश्रांती आणि निसर्गोपचारासाठी अप्पा उरळीकांचन येथे येऊन राहिले. निसर्गोपचार केंद्राजवळ एका बाजूच्या इमारतीत श्री. अत्रे गुरुजींकडे अप्पा राहत होते. त्यांच्या चाकरीसाठी गोपुरीहून श्री. आरोलकर या निष्ठावान तरुणास पाठविलेले होते. मी उरळीकांचन येथे अप्पांची भेट दि. १–३–७१ रोजी घेतली. त्यावेळी अप्पा अशक्त दिसले, तरी उत्साही दिसत होते. स्वतःच कॉटवरून उठून खाली लघवीला जाऊन आले. औषध कोणतेही घेत नव्हते, पण दूध, तूप, फळे,


# शिलंगणाचं सोनं

## आवृत्ती : तिसरी

**ब. मो. पुरंदरे**

**किंमत : तीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**

भात, पोळी, भाजी वगैरे आहार थोडथोडा ठराविक वेळी घेत असत. त्यांच्या गळयाला डाव्या बाजूस एक लहानशी गाठ येत असलेली दाखविली आणि आपल्याला गंडमाळेचा विकार झाला असल्याचे त्यांनी निजूनच पाटीवर लिहून दाखविले. अप्पांजवळ मी सुमारे अर्धा तास बसलो होतो. अप्पांनी मला फळें देण्यास श्री. आरोलकरांना हळू आवाजात बोलून सांगितले.

दि. ३ मार्चला पुण्यास जाऊन एक्सरे काढावयाचा आहे आणि आचार्य विनोबांच्या सूचनेवरून इंजक्शने घेण्याचे अप्पांनी मान्य केले आहे, असे श्री. आरोलकरांनी सांगितले आणि अप्पांनी त्याला संमती दर्शविली. त्यामुळे अप्पा या आजारातून बरे होतील असे वाटू लागले. परंतु पुण्यास येऊन ताराचंद रुग्णालयात तपासणी झाल्यावर श्री. आरोलकरांचे ६ तारखेचे जें पत्र मला आले त्यात त्यांनी लिहिले होते–'अशक्तता फार असल्यामुळें इतक्यात इंजक्शनेही झेपणार नाहीत. तरी लहानलहान डोस चालू करतील असे वाटते.' हे वाचून मात्र मी चरकलो आणि १० मार्च १९७१ ला दुपारी १ वाजता अप्पा गेलेही! अप्पांच्या आजारावर निसर्गोपचाराविना औषधोपचार न झाल्यासारखेच!!

अप्पांची जन्मतारीख ४–११–१८९४ म्हणजे मरणसमयी त्यांचे वय ७७ वर्षांचे होते. तेव्हा त्यांना लवकर मरण आले असे म्हणता येत नाही. पण नियमबद्ध निग्रही वागणुकीमुळे त्यांनी आपले शरीर चांगले काटक राखले होते. गायीचे दूध ते घेत असत. पण ते सोडण्याचे प्रयत्न त्यांनी आयुष्यात तीन वेळा केले. तीनही वेळा प्रकृती बिघडल्याने त्यांनी पुन्हा ते सुरू केले. मरणापूर्वीही सुमारे १–१॥ वर्ष त्यांनी दुधदुभते सोडले होते. ते आजारी पडल्यावर पुन्हा सुरू केले.

१ मार्चच्या भेटीत मी अप्पांना विचारले की, बोलताना त्रास होऊ लागल्याला किती काळ झाला? त्यांनी लिहून दाखविले, २–३ वर्षे. हा त्रास होऊ लागताच औषधोपचार करून घेतला असता तर अप्पा शतायु झाले असते, असे मला वाटते. म. गांधीजींच्या एकादशव्रताचे निष्ठेने आदर्शवत् पालन करणारे प्रज्ञावान् पू. अप्पा भगवद्गीतेतील स्थितप्रज्ञाप्रमाणे वागणारे अप्पा या जगातून गेले तरी मनःचक्षूंपुढून दूर होऊ शकत नाहीत. अप्पांच्या स्मृतीला प्रणाम.



"द्राक्षासव घेताय्?" "छे,

# द्राक्षोविन घेतोय्...

माझी प्रकृती उत्तम राखणारे प्रभावशाली आरोग्यदायी टॉनिक आहे हे."




अगदी बरोबर. द्राक्षोविन हे कांही केवळ एक द्राक्षासव नव्हे. अश्वगंधा आणि सरस्वती या वनस्पतींनी हे प्रभावशाली बनविले आहे. अश्वगंधा ही तरतरी आणणारी एक आश्चर्यकारक वनस्पती आहे. तिने प्रकृती सुधारते व जोम आणि उत्साह वाढू लागतो. सरस्वतीने शरिरावरचा ताण कमी होऊन त्याला आराम मिळतो व तुम्हाला गाढ झोप लागते. द्राक्षोविन स्पेशल नियमितपणे घ्या. त्याने संपूर्ण पचनक्रिया सुधारते आणि पोटाची तक्रार राहात नाही. भूक वाढते, पचन चांगले होते आणि झोप चांगली लागू लागते. शरीराला आराम पडतो, तरतरी व जोम वाढू लागतो आणि प्रकृती निकोप बनते. आल्हाददायक चवीचे द्राक्षोविन स्पेशल नियमितपणे घ्या. पचन नियमित राखा. तारुण्यसुलभ निकोप प्रकृतीचा आनंद मिळवा.

धूतपापेश्वर

**धूतपापेश्वर इंडस्ट्रीज लिमिटेड**
पनवेल, महाराष्ट्र.

शाखा : सावदी रोड, अहमदनगर

डेपो : मेसर्स खरे अॅन्ड सन्स, पुणे २

# निवडणूक - एक अन्वय

श्रीधर

सुखाचा वा दुःखाचा पेला पचविणे कठीण !

अमृतमंथनानंतरचे अमृत व विष देवांना पचविता आले नाही. आजच्या या जगात निवडणूक हे जिथे अमृतमंथन आहे, तेथे विजयाचे अमृत व पराजयाचे विष पचविणे जड गेल्यास नवल ते काय !

१९७१ च्या अमृतमंथनाच्या वेळी एकाच काँग्रेसच्या घरात राहणाऱ्या सहकाऱ्यांनी घर फोडले होते, भाऊ भाऊ (संसोपा–प्रसोपा, डावे–उजवे कम्युनिस्ट) परस्परविरोधी उभे होते, बंधुरूप असे विभिन्न जमातीचे गट परस्परांकडे शत्रुत्वाने पाहत होते. पुराणातील अमृतमंथनाच्या वेळी भगवानाने स्वरूप मोहिनीचे रूप घेऊन जी लबाडी केली, तसे होऊ नये म्हणून की, काय यावेळी सौंदर्यशाली इंदिराजी, तारकेश्वरी, गायत्रीदेवी निवडणुकीत उतरल्या असाव्यात.

दोन महिने सारा देश प्रचाराने घुसळून काढला गेला. यातून कडवटपणा, शत्रुत्व, खोटेनाटे आरोप, सरकारी यंत्रणेचा व अधिकाराचा गैरवापर, जातीयवादाचा आसरा, दहशतवाद, पैशांचा दणका असे अनेक फटके जनतेला सहन करावे लागले.

राज्यलक्ष्मीला विजय आवश्यक असतो. यातून सत्तेसाठी 'इंदिरा हटाव' व सत्ता बचावण्यासाठी 'गरिबी हटाव' या भूमिका तयार झाल्या.

निवडणुकीच्या निकालानंतर अमृत मिळाल्याचा आनंद नव-काँग्रेसला झाला, तर पराभवाने हलाहलाचा दाहकपणा विरोधी पक्षांना जाणवला.

नव-काँग्रेसवाले तर विजयाने बेभान झाले.

'ठाकऱ्यांच्या ठिकऱ्या उडवू' इति मोहन धारिया.

'बाळाच्या बाळांनो, गल्लीतच रहा, दिल्ली तुमच्यासाठी नाही' इती वसंतराव.

गंमत वाटते की, महाराष्ट्र काँग्रेसचे विचारवंत नेते यशवंतराव यांनीही वक्तृ-

त्याचा पट्टा बाईंच्या मोहोब्वतीखातर विचार न करता फिरवला. संयमी, मितभाषी वसंतरावांनी तोंडातला पाईप बाजूस ठेवून टीकेचा फटाका तर तोंडात धरला नाहीना असा भास होत होता.

विरोधी पक्षीय पराभवाच्या कारणमीमांसेसाठी सुरस व चमत्कारिक गोष्टी शोधू लागले.

साधारणपणे विजयी उमेदवार निवडणूक हा जनमानसाचा कौल मानतो, तर 'नैतिकदृष्टया विजयी असलेला' पराभूत उमेदवार पराजयाचे खापर सरकारी यंत्रणेचा गैरवापर, दहशतवाद, पैशाचा गैरवापर, जातीयवाद आदींवर फोडत असतो. परंतु यावेळी या कारणाने पराभवाची मीमांसा होणे शक्य नव्हते. म्हणून धक्का देणारी व हतबुद्ध करणारी नवीन कारणे शोधून काढण्यात आली. ते म्हणजे–

'केमिकल पेपर थिअरी.'

ही अफवा इतक्या वेगाने सर्वत्र पसरली की, त्यावर विश्वास ठेवणाऱ्या सुशिक्षित लोकांचे कौतुक करावे की, ते कारण शोधून काढणाऱ्यास बक्षीस द्यावे हेच समजेनासे झाले.

ही 'केमिकल पेपर थिअरी' पटविताना भ्रष्टाचारामुळे व सरकारी दडपणामुळे 'गोलमाल' शक्य आहे हे ठसविण्याचा प्रयत्न झाला. तसाच आधुनिक विज्ञान किती प्रगत झाले आहे, यावरोवर गुप्तहेरांच्या प्रभावी कारवायांमुळे परदेशात अनेक सरकारे कशी उलथली गेली हे सांगून सर्वसामान्यांस गप्प बसविण्याचा प्रयत्न करण्यात आला. तरीदेखील ही कारणे मनाला पटत नाहीत. सरकारी नोकरातील विरोधी पक्षांचे सहानुभूतीदार असणारे भ्रष्टाचाराच्या गोष्टी फोडतील हे स्पष्ट आहे. एखाद्या देशातील गुप्तहेर विभागातर्फे 'शाईची किमया' झाली असेल तर त्याचा शत्रुदेशही गोष्ट आज ना उद्या उघडकीला आणील यात शंका नाही.

तरी पण अमुक ठिकाणी अमुक पक्षाचा बालेकिल्ला असताना वा बडे नेते उभे असताना त्यांच्याविरुद्धचा एखादा साधारणसा उमेदवार लाख लाख मतांनी निवडून येतो यात नाही म्हटले तरी रहस्य वाटतेच, या लोकांच्या शंकेबरोबर बाळासाहेब ठाकरे यांनी 'शाई'चा संशय व्यक्त केला आहे. तसेच बलराज मधोक व इतर नेत्यांनीही या निवडणुकीत काहीतरी 'गोलमोल' असल्याचा आरोप केला आहे.

थोडक्यात तुमची विचारशक्ती पुढाऱ्यांच्या दबावाखाली हतबुद्ध होते.

साधारणतः सामान्य जनतेत निवडणूकीबद्दल संशय राहता कामा नये. कारण या संशयातूनच निवडणूकपद्धत व लोकशाहीविषयी अविश्वास निर्माण होतो. कार्यकर्त्यांत असा संशय राहिला तर धोका जास्त. कारण हे कार्यकर्तेच लोकमत तयार करीत असतात. एकवेळ सामान्य जनता व कार्यकर्ते यांचा संशय मी समजू शकतो. कारण हे लोक भाबडेच असतात व जेव्हा एखादा जबाबदार लोकप्रिय नेता

अशी भाबडी विधाने करतो तेव्हा मात्र हतबुद्ध होण्याची पाळी येते. कारण य, धूर्त व चाणाक्ष नेत्यांना आपल्या अशा अफाट विधानांचा परिणाम लोकशाही प्रियतेवर व स्थिरतेवर होणार आहे याची जाणीव नसेल, असे कसे म्हणता येईल ?

आजवर चालू असलेल्या जमातवाद, जातीयवाद, गटबाजी, प्रांतीयवाद, धार्मिकवाद व निरनिराळ्या निष्ठा यांचे प्राबल्य, पैशांचे वाटप, गरिबीचे EXPLOITATION, दहशतवाद, सरकारी यंत्रणेचा गैरवापर यावेळी झालाच नसेल असेही मानणे भाबडेपणाचे ठरेल. तरीपण 'केमिकल पेपर थिअरी' मान्य करणे म्हणजे लोकशाहीवरील उरलेला डळमळीत विश्वास उखडून टाकण्यासारखे आहे. आमचा लोकशाही, गुप्त मतदानपद्धती, निःपक्षपाती सरकारी यंत्रणा यावरचा विश्वास केमिकल पेपर थिअरी' जर दुर्दैवाने सिद्ध झाली तर ढासळून पडेल याचीही जाणीव राज्यकर्त्यांना असली पाहिजे.

लोकशाहीवरील विश्वास ढासळू न देण्याचा उत्तम मार्ग म्हणजे विरोधी पक्षीयांच्या दृष्टीने वादग्रस्त ठरलेल्या ठिकाणी मतदानाविषयी निःपक्षपाती न्यायालयीन चौकशी व्हावी. आज प्रबळविरोधी पक्ष नसल्याने, तसेच सत्तेवर मुक्तपणे बाजू मांडणारी वृत्तपत्रे नसल्यामुळे व जागरूक विचारी लोकमत न्यायालयीन चौकशीचा उपाय हाच प्रभावी ठरेल याचा विजयी नव-काँग्रेसने गंभीरपणे विचार करावा.

आणखी एक गंभीर विचार प्रत्येक पक्षातील विचारवंतांनी–जो एक छोटा वर्ग आहे त्यांनी–खालील मुद्यांबाबत आत्मचिंतन म्हणून करावा–

१. गेल्या ६७ च्या निवडणुकीत किती मतदारांनी त्यावेळी मतदान केले नाही? न करण्याची कारणे कोणती ?

२. गेल्या निवडणुकीत किती तटस्थ मतदारांनी त्यावेळी मतदान केले ? याची कारणे कोणती ?

३. राजकीय पक्षांची वाढलेली व कमी झालेली मतसंख्या व त्यांची कारणे काय ?

यातून पक्षांचे सामर्थ्य वा दौर्बल्य दिसेलच, शिवाय एका विराट सत्याची जाणीव होईल

हे सत्य म्हणजे बहुतेक विरोधी पक्ष हे मध्यमवर्गाशी संबंधित आहेत. या पक्षांचा झोपड्यात, रस्त्यावर, खेड्यात व जंगलात राहणाऱ्या जनतेशी संबंध फारच थोडा आहे. जो आहे तो आंदोलनापुरता व निवडणुकीपुरता. या सत्याची जाणीव अटलविहारी वाजपेयी यांना झाली आहे. म्हणून 'पक्षाचे काम सर्वस्पर्शी करण्याचे प्रयत्न करू, समाजातील सर्व थरात जाऊन काम करू' असे ते सांगत आहेत. निवडणूक निकालांचा त्यांनी ज्या खिलाडूवृत्तीने स्वीकार केला त्यामुळे

त्यांची प्रतिमा अधिक उजळली आहे. शिवाय इंदिराजींनंतरचा राष्ट्रीयविरोधी नेत्याचा मान त्यांना लाभला आहे.

या निवडणुकीचा निकाल सर्वांना हादरा देणारा आहे यात शंका नाही. विरोधी पक्षीयांनी एवढा प्रचंड धुव्वा होईल असे स्वप्नातदेखील पाहिले नसेल. त्यांचा अंदाज जरी इंदिराजी जिंकणार त्या २०० ते २४० जागा मिळवून असा होता. त्या द्र. मु. क., कम्युनिस्ट व मुस्लीम लीग यांच्या सहकार्याने मंत्रिमंडळ स्थापू शकल्या तरी बडी आघाडी कमीत कमी २०० जागा मिळवून एक प्रबळ विरोधी पक्ष म्हणून काम करील असाच होता. नवकाँग्रेसला २/३ पेक्षा जास्त जागा मिळतील याची त्यांना पुसटशीदेखील कल्पना आली नसेल. खुद्द नव-काँग्रेसच्या नेत्यांनादेखील आपण एवढ्या बहुमताने येऊ अशी अपेक्षा नव्हती.

१९६९ च्या फाटाफुटीनंतर द्र. मु. क., कम्युनिस्ट यांच्या आधारावर सत्तेचे कुंकू टिकवण्याचा प्रयत्न नव-काँग्रेसला महाग पडत होता. हे नवरोजी मिळवत्या बायकोला पाहिजे तसे लुटत होते. या बंधनातून मुक्त होण्यासाठी निवडणुकीचा आग्रह धरणाऱ्या यशवंतरावांचा आशावाद २८० जागांवर जात नव्हता व जगजीवनरामांचा ३०० जागांचा होरा इंदिरा गांधींच्या लोकप्रियतेची पावती मिळाल्यानंतरचा होता. खुद्द इंदिराजी बहुमत मिळेल की नाही, याबद्दल साशंक असाव्यात, नाहीतर तामीळनाडूतील लोकसभा निवडणूक समझौत्यासाठी विधानसभेच्या निवडणुकीत एकही जागा नाकारणारा नामुष्कीचा करार त्यांनी द्र. मु. क. बरोबर केला नसता. मुस्लीम लीग व कम्युनिस्टांसाठी त्यांनी जागा मोकळ्या सोडल्या नसत्या.

पण देशातील राजकीय हवा झपाट्याने बदलत होती. गेल्या वर्षात झालेल्या पोटनिवडणुकीतील नव-काँग्रेस विजयाने याची चुणूक मिळत होती. म्हैसूर व मणिराममधील विजयाचा अर्थ विरोधी पक्षीयांनी ओळखलाच नाही असे म्हणावे लागते. २० पैकी १६ ठिकाणी नव-काँग्रेस जिंकली. (हा बदल वाजपेयींना जाणवल्यासारखे दिसते. म्हणून ते आपला बलरामपूरचा नेहमीचा मतदारसंघ सोडून ग्वाल्हेरच्या सुरक्षित जागी आले असावेत या शंकेला पुष्टी मिळते.)

व्यापाऱ्यांचा HORSE SMELL चांगला व अचूक असतो असे म्हणतात. जानेवारीतील पहिल्या आठवड्यात नव-काँग्रेसला २४० वर जागा मिळतील असा अंदाज महाराष्ट्रातील एका प्रख्यात उद्योगपतीने बांधला होता.

परंतु भारतातील परदेशी वकिलातीतील अभ्यासू अशा ग्रुप विभागाचा होराही नव-काँग्रेसला बहुमत मिळेल असा असला तरी त्यांना २/३ पेक्षा जास्त जागा मिळतील असा नव्हता. मग पत्रकारांचा अंदाज चुकला त्यात नवल ते कोणते? विरोधी पक्षीय पुढाऱ्यांचे जाहीर अंदाज म्हणजे वाळूचे किल्ले. खाजगी बैठकीतील त्यांचे अंदाज इंदिराजींना बहुमत मिळणे शक्य आहे इतपतच होते.

मग हा चमत्कार घडला कसा ? याची कारणे काय असावीत ?' केमिकल पेपर थिअरी ?'

जोपर्यंत ही थिअरी सिद्ध होत नाही तोपर्यंत या थिअरीवर विश्वास बसणें अशक्य व अयोग्य आहे.

मग बँकांचे राष्ट्रीयीकरण व तनखेबंदी यामुळे इंदिराजींची एक फसवी प्रतिमा आकाशवाणी व सरकारी यंत्रणेचा दुरुपयोग करून तयार करण्यात आली, हा आरोप खरा, की जनसंघ भीतीचा बागुलबोवा करून मुस्लीम-ख्रिश्चनांची मते खिशात ठेवण्यात आली असा आरोप खरा ? (या जमातींच्या धर्मगुरूंनी 'इंदिरा काँग्रेसला मते द्या' असे फतवे काढले आहेत असे म्हणतात.) की, अल्पसंख्याकांच्या मतांबरोबर जमातवादी राजकारण, दहशतवाद, पैशाचे वापर हे नेहमीचे आरोप खरे.

यावरील आरोपात थोडेफार तथ्य असले तरी इंदिराजींच्या भारत दिग्विजयाचे याने उत्तर मिळत नाही. कारण असे आरोप गेली २० वर्षे होत आहेत. प्रत्यक्षात मात्र काँग्रेसची मते व जागा कमी होत होत्या. मग आजच मते मात्र ४३% मिळाली असता नव काँग्रेसला २२२ वरून ३५० जागा कशा मिळाल्या असाव्यात ? ५७ साली काँग्रेसला लोकसभेत ३७१ जागा होत्या. ५२–६७ पर्यंत काँग्रेसला ३५० च्या वर जागा मिळत होत्या. म्हणजें ७१ च्या निकालाबाबत 'अकल्पित न घडले सारे, जरी अकस्मात' असे म्हणावे लागते.

काँग्रेस नावात किती जादू आहे, त्याच्या थोर नेत्यांची पुण्याई किती आहे, आपली ताकद किती आहे, याची जाणीव सत्तेच्या झाडाभोवती विळखा घातलेल्या काँग्रेसरुपी अजगरास नव्हती. विरोधी पक्षांच्या शेपटीवरच पडल्याने त्यांच्यावर काहीच परिणाम होत नव्हता. ६७ च्या पराभवाने या अजगराने कात टाकायला सुरुवात केली.

इंदिराजींना लोकातील असंतुष्टतेची जाणीव होती तरी पाटील-कामराज-घोष यांसारखे गटबाज व सत्तास्वार्थी नेते आत्मवंचनेने व सत्तेच्या गँग राजकारणात मग्न होते. अशा 'गँगस्टर' नेत्यांचा इंदिराजींनी धुव्वा उडविला याचे कौतुक प्रत्येक प्रांतातील मध्यमवर्गीय सुशिक्षितास वाटले. पंतप्रधानांच्या शौर्याचे, धैर्याचे त्यांनी मनातल्या मनात कौतुक केले असावे.

कारण सिंडिकेटवर सरळ हल्ला करण्याऐवजी इंदिराजींनी मोरारजींना अर्थमंत्री-पदावरून दूर केले. शिस्तप्रिय व अहंकारी मोरारजी चरफडत मंत्रिमंडळातून रागाने निघून गेले तरी सिंडिकेट गप्पच बसली होती. इंदिरा गांधींनी संजीव रेड्डींच्या उमेदवारीला छुपा विरोध केला तेव्हा यांना आपल्या गँगच्या सामर्थ्याचा गर्व होता. जेव्हा संजीव रेड्डी पडून सर्वजण 'गिरी'जन झाले तेव्हा हे शुद्धीवर आले. तोपर्यंत उशीर झाला होता. कुंपणावरचे यशवंतराव सत्ताप्रसादासाठी समाज-

वादाच्या दिंडीत सामील झाले होते. राजस्थानचे सुखाडिया, म. प्र. चे शुक्ला व आंध्रच्या ब्रह्मानंद रेड्डी आदी सुभेदारांनी दिल्लीच्या सुलतानाच्या दरबारात नजराणे पाठविले होते. तरी पण म्हैसूर, गुजरातमध्ये सिंडिकेटची सत्ता होती. उत्तर प्रदेशातील उत्तराधिकारी चंद्रभानु गुप्ता सिंडिकेटच्या बाजूला होते. बिहारमधले जगजीवनराम काँग्रेसचे 'जीवन' रामसुभगसिंगांमुळे कधी 'राम' म्हणतील याचा पत्ता नव्हता.

द्र. मु. क. च्या पाठिंब्याची किंमत कोटचवधी रुपये होती. तर कम्युनिस्टांच्या पाठिंब्यात पाठीमागचा वाटा अपेक्षित होता. यात 'इंदिरा हटाव' कार्यक्रमावर आधारलेली संघटना काँग्रेस, स्वतंत्र, जनसंघ व संसोपा यांची होऊ घातलेली बडी आघाडी. सत्तावादी काँग्रेस अजगाराचे दुसरे मुख पहिल्याला खाऊ लागले पाहताच इंदिराजींनी आक्रमक भूमिका घेतली.

या धूर्त महामंत्र्याने आपल्या बेताचा सुगावा लोकसभा हिवाळी अधिवेशन संपले तरी विरोधी पक्षांना लागू दिला नाही. (अटलविहारी वाजपेयींनी हे निवडणुकीचे भविष्य एक वर्षापर्वी केले असले व जनसंघाने संघटनात्मक तयारी चालविली असली तरी या निवडणुकीत जनसंघाला फायदा उठविता आला नाही, हे निकाल सिद्ध करतात.)[1]

डिसेंबर निवडणूक घोषित होताच 'बड्या आघाडी'चे प्रयत्न सुरू झाले. तरी पण गुजरात-म्हैसूरमध्ये संघटना काँग्रेस अनुयायांचा विरोध शांत करता करता मोरारजी-निजलिंगप्पा थकले. चरणसिंगाचा रुसवा फुगवा, जागेच्या वाटपावरून झालेले तीव्र मतभेद, बिहार, उ. प्रदेश येथे झालेल्या मारामाऱ्या, मुंबई येथे शिवसेनेच्या सहाय्याने स. का. पाटील यांनी खेळलेले किंग मेकरी गलिच्छ राजकारण यामुळे बड्या आघाडीला निवडून देऊन फायदा होईल का याबाबत सुशिक्षित मतदार साशंक होता. पण सुशिक्षित मतदार हा पूर्वीही काँग्रेसचा कधीच आधार नव्हता व आजही नाही.

देवमाशाचे सामर्थ्य शेपटीत असते, तसे काँग्रेसचे सामर्थ्य ग्रामीण भागात पसरलेल्या संघटनेच्या ताकदीवर व जनतेत आहे.

शहरी सुशिक्षित मध्यमवर्गीयाला या ताकदीचे महत्त्व कळले नसले तरी समजणे अवश्य आहे.

कारकुनबाबूला हवे असते एअर कंडिशन ऑफिस, भुयारी रेल्वे, कमीत कमी बसेस. यांच्या मिसेसना ब्लॉक, फ्रीज, स्कूटर, कॉन्व्हेन्ट स्कूल आदि गोष्टी प्रेस्टीज व स्टेटस्‌साठी हव्या असतात. खाजगी कंपन्यातून बोनस मिळविणारे कामगार व कारकून संपावर जातात, तसे सुखवस्तु बँक कर्मचारी जातात. मग unfortunately भारतात जन्मलेले अमेरिकनाईझ पायलट हवाई सुंदरीसह पगारवाढीसाठी संपावर गेले तर नवल ते काय? आज एक्झिक्युटिव्ह, इंजिनियर, डॉक्टर, हा वर्ग श्रीमंतात मोडू लागला आहे.

मारवाडी, सिंधी, पंजाबी व्यापाऱ्यांचे ध्येय पैसा. लबाडीने नफा. टॅक्स बुडवून नफा. Exploite करून नफा. मग धंद्यातील Code of Conduct, कामगार हित, स्वस्त व दर्जेदार माल, राष्ट्रप्रतिष्ठा या कल्पनाको मार गोळी. यांच्या सेवेसाठी सेल्स टॅक्स ॲडव्हाइजर, इन्कम टक्स अॅडव्हाइजर, चार्टर्ड अकांउटट हा बुद्धिवंताचा वर्ग हाजीर. गरीब सरकारी नोकर पैशाने विकत घतलेली वृत्तपत्रे यांची मंत्री, खासदार याचे जावई. सरकार यांचेच.

असा मध्यमवर्गीय बाबू व श्रीमंत संधी' साधू ' यांच्या दृष्टीसमोर झोपडपट्टी दिसली की हे अस्वस्थ होतात. झोपडपट्ट्यांमुळे यांच्या शहरांचे सौंदर्य बिघडते. (सरकार जागा देऊ शकत नाही व ब्लॉकची भाडी-पागडी परवडत नाही). यांना झोपडपट्टीतील गुन्हेगारी दिसते. (जणू यांचे जीवन धुतलेल्या तांदळाप्रमाणे स्वच्छ आहे). झोपडपट्टीतील हातभट्टीने यांना शहारा येतो. (यांना परदेशी दारू प्रिय). झोपडपट्टीतील वेश्याव्यवसाय यांना बोचतो. (कुलाबा-कांदेवाडीचे काय ?) ही तर झोपडपट्टीची कथा. जुन्या मोडक्या चाळीत राहणाऱ्यांकडे हे श्रीमंत बघतात का ? चाळवाले झोपडपट्टीवाल्यांचे प्रश्न जाणतात का ?

पण हे सर्व शहरी माणसांना खेड्यातील माणूस परकाच वाटतो. शहरी जीवनाने, शिक्षणाने त्याचे मन जसे आधुनिक झाले, तसे पाश्चिमात्य झाले आहे. राष्ट्र, लोकशाही, समाजरचना, समाजवाद या आधुनिक कल्पना शहरी माणूस त्यांच्या पाश्चिमात्य बनलेल्या दृष्टीतून मांडू लागतो. आधुनिक शिक्षणाने त्याला ग्रामीण भागातील आर्थिक, सामाजिक मागासलेपणा दिसतो, विषमतेवर आधारलेले जातीयवाद व जमातवादाचे भीषण दर्शन होते, मध्ययुगीन परंपरेचा व रूढीचा प्रबळ पगडा आढळतो, परंपराप्रिय ग्रामीण मन त्याला स्तिमित करते.

कोणत्याही व्यक्तीचा, समाजाचा वा वर्गाचा स्वभाव व मनोरचना तावडतोब बदलणे शक्य नाही. त्यांचा आहे त्या स्वभावाचा देशहितार्थ, समाजहितार्थ उपयोग करावा. स्वभाव बदलण्याची क्रिया ही प्रदीर्घ व संथ असते. त्यासाठी ठोसपणे काम करणाऱ्या निष्ठावंत, निःस्वार्थी कार्यकर्ते त्या मातीतून निर्माण होणे आवश्यक आहे. या निसर्गाच्या मूलभूत नियमाचा विसर पडल्यामुळे शहरी संस्कृतीचे विरोधी पक्ष ग्रामीण जीवनाच्या त्वरीत बदलासाठी क्रांतीची स्वप्ने पाहात आहेत. यांच्या क्रांतीतून कदाचित जुलूम करणारा वर्ग नष्ट करू शकतील, पण समाजाची मनोरचना ते बदलू शकतील का ?

पण क्रांतीला बहुसंख्यांकांचा नैतिक पाठिंबा लागतो. भारतात बहुसंख्य ग्रामीण जनता आहे. काँग्रेसचा आधार ही ग्रामीण जनता आहे.

ग्रामीण लोकांच्या सुखदुःखाच्या, नीति-अनितीच्या, चांगल्या-वाईट यांच्या कल्पना आपणा शहरी माणसांना माहिती नाहीत. त्यांच्या कल्पनेत व शहरी

पृष्ठ ४६ वर

एक विचार मला अनेकदा सतावीत असतो.

आमच्या गायक कलाकारांच्या जीवनात जेव्हा मी डोकावून पाहतो तेव्हा अनेकांच्या बाबतीत मला असं जाणवतं की त्यापैकी बरेचसे कलाकार केवळ अपघातानं गायक झाले आहेत. आयुष्यातील बरीचशी चांगली वर्ष त्यांनी आपल्या घराण्याला शोभेल असा पेशा पत्करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्यात खर्ची घातली आहेत. प्रसंगी अत्यंत मेहनतपूर्वक मिळविलेल्या संगीत साधनेलाही दूर लोटण्याचा प्रयत्न केला आहे. एकीकडे घराण्याची प्रतिष्ठा, नावलौकिक तर दुसरीकडे संगीताचं वेड व ते साध्य करण्याकरता केलेली धडपड अशा कोंडीत सापडलेला आमचा गायक केवळ एखाद्या अपघातानं किंवा नियतीचं बाहुलं बनून गाण्याला शेवटी आपलं

# प्रभा अत्रे

## एक बंडखोर
## पण
## सौंदयवादी गायिका

**वा. वा. गोखले**

जीवन सर्मपित करतो असं दिसून येतं. ह्याला अपवाद नाहीत असं नाही.

मुसलमान अगर अन्य कलाकारात मात्र ही दोलायमान अवस्था दिसून येत नाही. जन्मतःच एखादा मुलगा गायक अथवा वादक होणार हे समजूनच त्याला तालीम मिळू लागते आणि त्याच्यावर संस्कार घडतात ते तो उद्याचा फैयाजखाँ, अल्लारखाँ किंवा विलायत हुसेन होणार ह्या जाणीवेचे. आपण कलाकार. आपला पेशा गायक-वादकाचा. ह्यात तडजोड नाही.

हा विचार उदाहरणानं जास्त स्पष्ट होईल.

काही वर्षांमागे एकदा शकीलाबानू भोपाली ह्या गज्जल, कव्वाली गाणाऱ्या बाईचा कार्यक्रम ठरविण्याच्या निमित्तानं तिला भेटण्याचा प्रसंग आला. त्यावेळी ती १६–१७ वर्षांची मुलगी असेल नसेल. तिचं नावही झालेलं नव्हतं. आजची ही



'गज्जलची सम्राज्ञी' त्याकाळी कार्यक्रम मिळविण्याकरता धडपड करीत होती. माझे मित्र श्री. जी. एन. जोशी ह्यांना बरोबर घेऊन मी तिचा पत्ता शोधत माहीमच्या बाजारात हिंडत होतो. शेवटी एका पडक्या घराच्या पडवीत आडोसा करून कसंबसं राहणाऱ्या ह्या शकीलाबानूचा पत्ता मिळाला. वालीदसाहेब (वडील) बाहेर आले. त्यांच्याशी प्रास्ताविक भाषण झाल्यावर आतून एक काळीसावळी, उभार अंगाची पोरवजा तरुणी बाहेर आली आणि तीही आमच्या संभाषणात भाग घेऊ लागली. वास्तविक तिला मुंबईत मिळेल तो कार्यक्रम घ्यावयाचा होता. पण बोलणं असं की जसं तिचे एकामागून एक प्रोग्रॅम लागून राहिले आहेत आणि केवळ आमच्यावर मेहेरबानी म्हणून ती कार्यक्रम घ्यावयास तयार आहे. भाषा फक्त सौदा जमविण्याची. आपण कलाविक्रय करण्यास बसलो आहोत ह्या भूमिकेवरून !

आणखी एक गोष्ट अशीच सांगता येईल. 'प्रान्तीय एकात्मता' की काय ते सहजासहजी साधता आली तर पाहावी म्हणून आपल्या महोत्सवात एखाद्या दिवशी गरबा नाच ठेवावा ह्या सद्‌भावनेनं एका गुजराथी स्त्री-मंडळाच्या एका प्रतिष्ठित-बाईकडे जाण्याचा प्रसंग आला. वास्तविक बाई होत्या एक सामाजिक कार्यकर्त्या. बड्या अंमलदारांच्या पत्नी. गरबा नाचणाऱ्या स्त्रियाही काही पेशानं गरबा नाचणाऱ्या नव्हत्या किंवा त्यांना पैशाची तशी फारशी अवश्यकता होती असंही नव्हतं. पण त्या विदुषीने आम्हाला अगदी व्यवहारी भाषेत सवाल टाकला, 'हे पाहा, तुम्ही रु. ३०० दिलेत तर तुम्हाला एकीसारख्या एक १५ ते २० वर्षांच्या मुली मिळतील. त्यांचे घागरे जरीचे असतील व त्यांना घुंगूर लावलेले असतील. रु. २०० दिलेत तर २० ते ४० वर्षांच्या वाटेल त्या आकाराच्या (!) बायका मिळतील आणि त्यांचा पेहराव साधाच असेल! बोला, तुम्हाला कोण पाहिजे?'

वाण्याकडे गेल्यावर तो ज्या निर्विकारपणानं निरनिराळ्या श्रेणीच्या डाळ, गुळाचे भाव सांगतो त्याच व्यवहारी हिशेबानं त्या बोलल्यावर आम्ही काय बोलणार? जसा दाम तसा माल. परवडेल तो घ्या. हिशोब चोख!

वरील दोन उदाहरणं अतिरेकी म्हणून सोडून दिली तरी वरील विचाराचं निराकरण होत नाही. कसं ते पहा. आमचे जी. एन. जोशी काळा कोट घालून कोर्टात उभे राहावयाचे. पण झाले गायक. पण त्यांना गायनसिद्धी मिळविण्यासाठी, घराण्याची प्रतिष्ठा सांभाळण्यात एक तपाहून जास्त वर्षे झगडावं लागलं. गोविंदरावांचे एक ठीक होते. त्यांचे वडील तरी निष्णात कायदेपंडित होते. त्यांनी आपला मोठा मुलगा आपली गादी चालवील अशी अपेक्षा केली तर ते चूक ठरणार नाही. पण आमच्या माणिक वर्मा घ्या. त्यांच्या आई एके काळच्या गायिका. त्यांच्या मुलीनं गायिका होणं हे तर स्वाभाविकच म्हणावं लागेल. तरीसुद्धा त्यांच्या आई-वडिलांचा आग्रह माणिकनं आधी पदवीधर व्हावं. तंबोरा नंतर धरावा. पदवीधर होणं जास्त प्रतिष्ठेचं, गायनाचा पेशा पत्करणं कनिष्ठ अशी संगीताची संभावना गायकाच्याही घरात होणं ही खचित चिंतेची बाब मानावयास हवी.

गायन हेच माझं जीवनसर्वस्व आणि त्यालाच मी सर्वस्वी वाहून घेणार असं म्हणणारा, मंगेशीवर अभिषेक करणारा एखादाच जितेंद्र पाहावयास मिळेल.

आमचे कलाकार गायक-वादक हा पेशा म्हणून सहजासहजी पत्करीत नाहीत. ह्याला कारण आमची समाजव्यवस्था. रूढीनं, पारंपारिक व्यवसायानं, नीती अनीतीच्या फोल कल्पनांनी आणि समाजाच्या अनेक दृढ बंधनांनी आम्ही इतके घट्ट जखडले गेलो आहोत की चाकोरीच्या बाहेर पडण्याचं धैर्य दाखविणाऱ्या कलाकाराला केवळ असामान्य कला संपादन केल्यावरच अवहेलना, मानहानी करणाऱ्या निंदकांची तोंडं बंद करता येतात. अन्यथा त्याला आपलं हसू करून घ्यावं लागतं. पण आता ही परिस्थिती राहिलेली नाही. कलाकाराला लोकाश्रय आणि राजा-

श्रयही मिळाला आहे. समाजपुरुषाच्या मांडीला मांडी लावून बसण्याची प्रतिष्ठा त्याला प्राप्त झाली आहे. आर्थिक दृष्ट्याही वकिली, डॉक्टरीपेक्षा तो उणा पडत नाही.

न्यूनगंड असण्याचं त्याला आता काहीच कारण उरलं नाही. मान, प्रतिष्ठा, प्रसिद्धी तो आपल्या मगदूरीनं आज मिळवू शकतो, मिळवीत आहे.

म्हणनच प्रभा अत्रे ह्या जेव्हा 'मला हा पेशा म्हणून आवडत नाही' असं म्हणतात, तेव्हा मला खरोखर अचंबा वाटतो. आजच्या प्रथमश्रेणीच्या गायकांच्या यादीत प्रभा अत्रे ह्यांचं नाव वरंच वर घ्यावं लागेल, ह्याबद्दल संगीत रसिकांचे दुमत असू नये. कै. सुरेशबाबू माने ह्यांच्याकडून मिळविलेल्या तालमीवर त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेनं व प्रखर मेहनतीनं आपली स्वतःची अशी गायकी उभी केली आहे. तरीही त्या जेव्हा म्हणतात, 'मला गायिका म्हणून पेशा नको आहे' तेव्हा मला त्यांच्या जीवनात खोलवर डोकावून पाहावंसं वाटतं, कदाचित ह्याचं उत्तर मिळेल ह्या आशेनं.

प्रभा अत्रे ह्यांचा जन्म पुण्याचा. त्यांच्या मातोश्री जेजुरीच्या इनामदार पेशवे घराण्यातल्या तर वडील पुण्याजवळ माळशिरस भुलेश्वर देवस्थानाचे वारसदार, रास्ता पेठ शाळेचे मुख्याध्यापक. आई-वडिलांच्या खानदानी घराण्याचा वारसा घेऊन आलेल्या प्रभा, उषा ह्या दोन मुलींवर चांगलेच संस्कार घडणं स्वाभाविक होतं. फक्त दोनच अपत्यं असल्यामुळे वडिलांचा संसार आटोपशीर. यथावकाश दोन्ही मुली शिक्षणात पारंगत झाल्या. मोठी प्रभा बी. एस्सी. झाली तर धाकटी उषा एम्. बी. बी. एस्. झाली. प्रभाच्या मनातही डॉक्टर व्हावं असं होतं, पण पुण्याच्या कॉलेजात प्रवेश मिळेना म्हणून नाइलाजानं तिनं बी. एस्सी. पदवी घेतली आणि आपले मामा, प्रख्यात कायदेपंडित पेशवे ह्यांच्याबरोबर वकिली करावी ह्या हेतूनं वकिलीचा अभ्यास करून एल्. एल्. बी. पदवीही हासील केली (१९५४).

वस्तुतः अत्रे घराण्यात गाण्याची आवड फारशी कोणाला नव्हतीच. मग गाणं शिकण्याचं तर दूरच राहिलं. आई-वडिलांचा देवस्थानांशी निगडीत संबंध असल्यामुळे प्रातःकालच्या काकडआरतीशी आणि वाघ्या-मुरळीच्या 'येळकोट मल्हारी'शी काय संबंध आला असेल तेवढाच. पण खंडोबाला आपल्या वतनदाराकडून गाणं ऐकण्याची इच्छा झाली आणि संगीत चोरपावलांनी आबासाहेबांच्या वाड्यात घुसलं. निमित्त झालं आईच्या आजाराचं. त्यावेळी प्रभा जेमतेम ६–७ वर्षांची असेल-नसेल. आईचा आजार काही केल्या हटेना. शेवटी डॉक्टरांच्या सल्ल्यानं मानसोपचार करण्याचं ठरलं. मनाला विरंगुळा वाटावा म्हणून आईला पेटी शिकविण्यास मास्तर येऊ लागले. आईनं आपलं मन कोठेतरी गुंतवून ठेवावे एवढाच हेतू पेटी शिकण्याचा. गाण्याच्या आवडीचा काही संबंध पोहोचत नव्हता. मात्र

छोटी प्रभा हळूहळू पेटीवरून बोटं फिरवू लागली. शाळेतील गाणी म्हणता म्हणताच ऐकलेल्या गाण्याच्या ध्वनिमुद्रिका पेटीतून उमटवू लागली; गळ्यातून काढू लागली. 'तुमची प्रभा किती छान गाते हो.' शेजारचे वासुअण्णा, सखुताई आबांना सांगू लागले. 'हिला गाणं शिकवा' असा तगादा लावू लागले. शेवटी आबांनी मनावर घेतलं आणि आपल्या शाळेतल्या खळदकर शिक्षकांकरवी विजय करंदीकर नावाच्या संगीत शिक्षकाला प्रभाला गाणं शिकविण्यास सांगितलं. त्यांची शिकविण्याची पद्धती चांगली होती पण आधी शाळेचा अभ्यास मग संगीत, अशी आबांची सक्त ताकीद असल्यामुळे परीक्षा आल्या की गाण्याला सुटी मिळे. तरी शेजारच्या गणपतीउत्सवात किंवा शाळेच्या संमेलनात प्रभा गाणं म्हणून वाहवा मिळवू लागली.

ह्याच सुमारास सुप्रसिद्ध संगीत-जाणकार श्री. वामनराव देशपांडे ह्यांचे थोरले बंधू शास्त्रीबुवा घरी आले. शास्त्रीबुवांचा अत्रे कुटुंबाशी घरोबा. प्रभाचं गाणं ऐकून तिनं एखाद्या मोठ्या गायकाकडून तालीम घ्यावी, नव्हे; सुरेशबाबूंकडून तालीम घ्यावी असा त्यांनी हट्ट धरला. पण ते कसं व्हावं? सुरेशबाबू बडे गवई. त्यांना द्यावयास साजेशी बिदागी कोठून आणावयाची? आबांना विचार पडला, पण शास्त्रीबुवांनी दिलासा दिला आणि सुरेशबाबूंकडे शब्द टाकला. 'प्रभाचं गाणं ऐकतो, मग सांगतो' असे म्हणून त्यांनी प्रभाला घेऊन येण्यास शास्त्रीबुवांना सांगितले. एवढ्या मोठ्या गवयापुढे गाण्याचा हा प्रभाचा पहिलाच प्रसंग. समोर हिराबाई, कमलाबाई बसलेल्या. पण करंदीकरांकडून मिळालेली गाण्याची समज, आत्मविश्वास अन् गाणं शिकण्याची जिद्द ह्यांच्या जोरावर प्रभाने इतके चांगले गाऊन दाखविले की, सुरेशबाबूंनी खूष होऊन गाणं शिकविण्याला तत्काळ संमती दिली आणि तीसुद्धा बिदागीची घासाघीस न करता.

एकीकडे कॉलेजशिक्षण तर दुसरीकडे गाण्याची तालीम चालू होती. (१९५०–५३) फर्ग्युसन कॉलेजमधून आपलं प्रॅक्टिकल आटोपून प्रभा सायकलवर निघे ती थडक प्रभात रस्त्यावर सुरेशबाबूंच्या घरी. सबंध दिवस लॅबोरेटरीत उभ्यानं काम केल्यामुळे थकवा आलेला असावयाचा पण प्रभानं गाण्याची तालीम चुकविली नाही. शेवटी, सुरेशबाबूंच्या ही गोष्ट लक्षात आल्यावर ते स्वतःच अत्र्यांच्या घरी सोमवार पेठेत जाऊ लागले. दोन-दोन तीन-तीन तास तालीम चाले. त्यात कंटाळा नाही, देणाराला, ना घेणाराला. सुरेशबाबू किराणा घराण्याचे प्रज्ञावंत गायक. सूर हा ह्या घराण्याचा प्राण. त्यात सुरेशबाबू विशेष सुरेले. दोन तानपुऱ्यांच्या सुरात षड्ज असा लावीत की, ऐकणाऱ्याच्या अंगावर रोमांच उभे राहावेत. खाँसाहेब अब्दुल करीम खाँसाहेबांचे सर्वच शिष्य सुरेल गात, घराण्याची गायकी उभी करीत, पण सुरेशबाबू आपल्या गुरूची खरी याद करून देत. 'पियाबीन आवत' ही खमाज ठुमरी खाँसाहेबांनंतर म्हणावी सुरेशबाबूंनीच. प्रखर मेहनत, दीर्घ चिंतन आणि असाधारण बुद्धीचातुर्य ह्या गुणसमुच्चयानं त्यांनी मिळविलेली गानसंपदा त्यांनी ह्या

गुणी, मेहनती आणि जिद्द असलेल्या आपल्या शिष्येला मुक्तहस्तानं दिली. त्याजबरोबर आणखी एक विशेष गोष्ट शिकविली, ती ही की, ' मी शिकवितो तेवढेच गाऊ नकोस. स्वतःची बुद्धी वापरून आपल्याला पाहिजे तसा रागाचा विस्तार कर. आपले शास्त्रीय संगीत इतके विस्तीर्ण, व्यापक, सखोल आहे की, त्याला ना आदी ना अंत. एकच राग दहा गवयांनी गायला तरी प्रत्येकाची तो राग मांडण्याची, त्याचे सौंदर्य खुलविण्याची तऱ्हा वेगवेगळी. म्हणूनच आपले संगीत कितीही ऐकले तरी त्याची गोडी कमी होत नाही. रागाचं स्वरूप दाखविण्याचं काम माझं. त्याच्या विस्ताराला मर्यादा नाही. ज्यानं त्यानं आपल्या बुद्धीनुसार, कुवतीनुसार त्याचं सौंदर्य वाढवावे. म्हणजे दर वेळी नवा आनंद मिळेल.'

सुरेशबाबू १९५३ साली अकस्मात निवर्तले. पण त्यांनी दिलेल्या अनमोल मंत्रानं प्रभाला अंतर्मुख केलं, नवी दिशा दाखवून दिली.

हळूहळू प्रभा अत्रे ह्यांचं गाणं आकार घेऊ लागलं. गाण्याचा पेशा पत्करण्याचं त्यांनी ठरविलं असतं तरी ते त्यावेळीही शक्य झालं असतं, इतक्या तयारीनं त्या गाऊ लागल्या होत्या. रेडिओवरही त्यांना नियमानं कार्यक्रम मिळू लागले होते.

ह्याचाच परिपाक म्हणून त्यांना केंद्र सरकारची गाण्याची शिष्यवृत्ती मिळाली. शिष्यवृत्तीच्या काळातील शिक्षण त्यांनी हिराबाईंकडे पूर्ण केले. (१९५५–५६). हिराबाईंच्या सहवासात त्यांना त्यांच्याबरोबर अनेक दौऱ्यांवर जाण्याची संधी मिळाली. मैफलीच्या अनुभवाचें जणू वस्तुपाठच.

उदयोन्मुख गायिका म्हणून बोलबाला व्हायला आणि त्यांनी नाटकातून कामं करण्यास सुरुवात करण्यास एकच गाठ पडली. सोशल क्लबच्या आग्रहाला दाद न देण्याचं ठरविलेल्या प्रभा अत्रे ह्यांनी १९५६ पासून दोन वर्षांत शारदा, मृच्छकटिक, सौभद्र, विद्याहरण, संशयकल्लोळ आदी सर्व संगीत नाटकातून धूमधडाक्यानं कामं करण्यास सुरुवात केली. कै. चिंतोपंत गुरव, कै. गणपतराव बोडस, छोटा गंधर्व, भालचंद्र पेंढारकर आदी आजी व माजी सर्व मोठ्या नटांच्याबरोबर कामं करण्याची त्यांना संधी मिळाली. रांगणेकरांच्या ' लिलाव ' ह्या नाटकातून तर त्यांनी वर्षभर सतत काम केलं. पण १९५९ साली आकाशवाणीची चालून आलेली नोकरी त्यांनी पत्करली आणि रांची स्टेशनवर त्या प्रोड्यूसर म्हणून दाखल झाल्या. तेव्हापासून नाटक कंपनी सुटली ती कायमचीच.

त्यानंतर पाच वर्षे नागपूर आकाशवाणीवर काढल्यावर त्यांची १९६५ साली मुंबई येथे बदली झाली आणि खऱ्या अर्थानं त्या संगीत दुनियेत दाखल झाल्या.

१९५३–५४ पासून प्रभा अत्रे लहान मोठ्या कॉन्फरन्समध्ये गात आहेत. अखिल भारतीय महिला परिषद, रेडक्रॉस कॉन्फरन्स करता त्या कलकत्त्यास जाऊन गायिल्या. पण त्यांचं नाव महाराष्ट्राबाहेर सर्वतोमुखी झालं ते १९५९ च्या कलकत्त्याच्या लाला बाबूंच्या कॉन्फरन्सनं. त्यानंतर आजतागायत त्यांनी शेकडो मैफली

गाजविल्या व बहुतेक सर्व मोठ्या कॉन्फरन्समध्ये हजेरी लावली.

बाहेरगावच्या मैफलींचे अनुभव अनेकदा हृद्य असतात तर कित्येकदा विनोदी किस्से म्हणूनही सांगावेसे वाटतात. नागपूरजवळच्या वणी ह्या आडगावी झालेल्या (१९६०) एका कार्यक्रमाची त्यांना चांगलीच ' आठवण ' आहे.

' मेलगाडी उशीरा पोहोचल्यामुळे पुढल्या गाडीचे कनेक्शन चुकले. अंतर तसे फार नव्हते. साधारण ६–७ मैलांचे. संध्याकाळचे सात वाजून गेले होते. अंधार पडू लागला होता. जवळपास वाहन मिळण्याचा संभव दिसेना. कार्यक्रमाला तर वेळेवर हजर व्हावयास हवं. म्हणून दोन साथीदारांसह रेल्वेलाईनच्या काठाकाठानं ठेचा खात आम्ही पायीच जात होतो. आधीच गाडीच्या प्रवासाचा त्रास झालेला. पायी चालावयाची सवय नाही. कसेबसे आम्ही मुक्कामाला पोहोचलो; तो रात्रीचे १० वाजून गेले होते. मी गाण्याला ताजंतवानं वाटावं म्हणून स्नान करून घेतलं आणि तडक गाण्याच्या मंडपात गेले व लागलीच गाणं सुरू केलं आणि काय आश्चर्य! माझा कार्यक्रम चांगलाच रंगला. पहाटेपर्यंत गाऊन मला जराही थकवा वाटला नाही. '

' नंतर दुसऱ्या दिवशी कळलं की ते लोक नेहमीच अशी पाहुण्यांची वरात काढतात !'

' खेडच्या (पुण्याजवळच्या) गणपती उत्सवात झालेला माझा कार्यक्रम तर अजबच. समोरासमोर दोन गणपती उत्सव आणि त्यांचं एकमेकांशी हाडवैर. एका मंडपात माझं गाणं, तर समोर तमाशाचा फड ! त्यांच्याकडील लाऊड स्पिकरची तोंडं आमच्या मांडवाच्या दिशेनं आणि त्यांचा आवाज जेवढा मोठा होईल तेवढा मोठा. आता आली का पंचाईत. मी कसंबसं गाऊ लागले. तोच ' पुढारी मंडळी ' ओरडून सांगू लागली, ' बाई आवाज आणखी वर चढवा. समोरच्यांच्यापेक्षा वरचढ झाला पाहिजेल !' मी काय गाणार. मी तंबोरा खाली ठेवला आणि सुन्न होऊन तो ' तमाशा ' बघू लागले. तेवढ्यात एक मुंडासं सावरीत पाटील गरजले, ' काय बाई, तुम्हांला नीट जायचं हाय का नाय ?' मी बळी देण्यास नेत असलेल्या शेळीप्रमाणे मुकाट जीव मुठीत धरून कसंबसं ' गाणं '' ओरडले. ''

तीन वर्षांमागे पं. भीमसेन जोशी ह्यांच्या मुलाच्या मुंजीत गाण्याचं कबूल केले होते म्हणून ग्वाल्हेरचा कार्यक्रम आटोपून मी मुंबईस येत होते. श्री. गजाननराव जोशी बरोबर होते. आमच्या फर्स्टक्लासच्या डब्यात रात्री आम्ही दोघे व आणखी एक इसम होता. गजाननराव वरच्या बर्थवर झोपले होते व मी खालच्या बर्थवर. तो अनोळखी इसम माझ्यासमोरच्या बर्थवर बसला होता. मी झोपण्यापूर्वी सावधगिरी म्हणून हातातल्या सोन्याच्या बांगड्या व गळ्यातले दागिने काढून पर्समध्ये ठेवले. बॅगेत आठशे रुपये होते तेही मुद्दाम काढून पर्समध्ये ठेवले व पर्स उशागती ठेवून निर्धास्तपणे झोपी गेले. पहाटेस जाग आली. पाहते तो माझी पर्स नाहीशी

झालेली. तो अनोळखी इसमही नाहीसा झालेला. सर्व ऐवज मिळून पंचवीसशेवर नुकसान झाले होते. माझं तिकीटही चोरीला गेलं होतं. माझ्या गाण्याची चोपडीही गेली होती. माझ्याजवळ अक्षरशः एक पैसाही राहिला नव्हता. त्या उद्वेगातच मी मुंबई गाठली व तशीच पुण्याची गाडी गाठून वेळेवर गाण्याच्या मंडपात दाखल झाले. झाल्या गोष्टीची वाच्यतादेखील मी कोणाजवळ केली नाही आणि गाण्यास सुरुवात केली आणि आश्चर्य म्हणजे त्या वैतागलेल्या मनःस्थितीतही मी खूपच जमून गायिले. समोर, पु. ल., वसंतराव देशपांडे आणि भीमसेन जोशी ह्यांच्याकडे आलेले अनेक बुजूर्ग बसले होते. त्यांनी माझं खूप कौतुक केले. चोरीचं दुःख मी पार विसरून गेले होते.'

'पलीकडच्या वर्षी सवाई गंधर्वांच्या पुण्यतिथीच्या वेळी असंच झालं. मी गाण्याचं कबूल करून बसले होते आणि एकाएकी मला सर्दी-फ्लूनं असं काही बेजार केलं की माझा कार्यक्रम रद्द करावा अशी मी डॉ. देशपांड्यांना विनंती केली पण त्यांनी 'गाणं ऐकायला तर याल' म्हणून आग्रहानं बोलाविलं. तेथे गेल्यावर 'आता आलाच आहात तर श्रोत्यांना तोंड तर दाखवाल थोडा वेळ' असं म्हणत म्हणतच त्यानी मला स्टेजवर नेऊन बसविलंदेखील' तेवढ्यात मुसळधार पाऊस कोसळू लागला आणि संबंध मंडप कोसळून पडला. तरी मी तशा परिस्थितीत गायिले. खूप रंगून गायले आणि पुरा 'दरबार' सुरांच्या नशेनं बेहोष होऊन डोलू लागला.'

## विलायतचा दौरा

गेल्या वर्षी आपल्या धाकट्या बहिणीला डॉ. उषा वाघ हिला भेटण्याच्या निमित्तानं त्यांनी इंग्लंडची वारी केली. उषा व तिचे यजमान लंडनमध्ये राहून एम. डी. चा अभ्यास करीत आहेत. आधीपासून ठरविल्याशिवाय तिकडे कार्यक्रम करणं कठीण असतं, कारण हॉल सहा–सात महिने आधीपासून ठरवावे लागतात. तरी दोन मोठे व कित्येक लहान कार्यक्रम त्यांनी दिले. 'रॉयल फेस्टिव्हल' मधला विशेष उल्लेखनीय. आपले वाद्यसंगीत थोडेफार परिचयाचे पण गळ्यातून निघालेले संगीत त्यांना नवीनच. तिकडे आपण काय गाणार, राग, ताल वगैरे सर्व माहिती आधी पुरवावी लागते व वेळेचं बंधन काटेकोर पाळलं जातं. मात्र पॅरिसमध्ये झालेला त्यांचा कार्यक्रम आपल्या इकडच्याप्रमाणेच झाला. त्यांना 'भारतीय बैठक' ऐकावयाची होती. चांगला चार तासाचा कार्यक्रम झाला तरी मांडी घालून बसलेले श्रोते शेवटपर्यंत दाद देत होते. समजून घेण्याचा प्रयत्न करीत होते. पॅरिस व लंडन टी. व्ही. वरही कार्यक्रम झाले. आजीबाई बनारसे ह्यांच्या घरी सुग्रास भोजनाबरोबरच भजनं आणि मराठी गाणी झाली.

इंग्लंडला जाण्यापूर्वी फक्त एक महिना अगोदर आकाशवाणीनं त्यांची तडकाफडकी धारवाड स्टेशनवर बदली केली व तावडतोब धारवाड स्टेशनवर रुजू

होण्याचे फर्मान सोडले. मुंबई स्टेशनवर नोकरीवर असताना त्यांना बाहेर कार्यक्रमाचे वारंवार बुलावे येत. त्याकरता लागणारी परवानगी मिळविणे नेहमीच डोकंदुखी होई. शक्यतो परवानगी शेवटपर्यंत अडवून ठेवणे, ध्वनिमुद्रिका देण्यास परवानगी नाकारणे, त्यांनी केलेले एखादे नवीन प्रॉडक्शन आयत्या वेळी रद्द करणे असे प्रकार वारंवार होऊ लागले. त्यातूनच कुरबुर, वाद, खटके उडू लागले. आणि त्याची परिणती त्यांना अखेरचा धक्का देण्यात– धारवाडसारख्या दूर शहरी बदली करण्यात झाली. त्यांनी आपल्या जागेचा राजीनामा दिला आणि त्या रेडिओबाहेर पडल्या. आज त्यांना नोकरी सोडल्याचं दुःख होत नाही पण आपल्या आवडीचं, संगीताशी निगडित, नवनवे प्रयोग करून पाहण्याचे साधन गमविल्याचं त्यांना मनस्वी वाईट वाटतं.

लवकरच त्या अमेरिकेला जाण्याचा बेत करीत आहेत. तेथे जाऊन आवाज नियंत्रण (Voice Culture) चा त्या अभ्यास करणार आहेत. पाहिजे तसा आणि पाहिजे तेव्हा आपला आवाज मुलायम आणि परिणामकारक व्हावयास पाहिजे असं त्यांना इग्लंडचा दौरा करून आल्यापासून प्रकर्षाने वाटत आहे. त्याचप्रमाणे रेडिओच्या नोकरीमुळे त्यांना ध्वनिमुद्रण करण्याचा जो अभ्यास करता आला-त्याचेही आणखी खास शिक्षण घेण्याचा त्यांचा मानस आहे. ध्वनिमुद्रक स्वतःही गायक असला तर मुद्रण निश्चित जास्त प्रभावीरीत्या करील असा त्यांना विश्वास वाटतो.


## कर्नाटक संगीत

कर्नाटक संगीतानेही अलीकडे त्यांना वेड लावलं आहे. सूक्ष्म अभ्यासानं त्यांना खात्री वाटते की हिंदुस्तानी संगीत व कर्नाटक संगीत ह्यात तसा मूलभूत फरक नाही.

ह्या दोन्ही प्रवाहात एक सुखद संवाद साधता येईल असं त्यांना वाटतं. निदान संस्कृत भाषेतील त्यांच्या रचना व राग आपल्या हिंदुस्थानी संगीतावरोबर अभ्यासल्या तर दोहोतील अंतर कमी व्हावयास हरकत पडू नये असा त्यांना विश्वास वाटतो व त्या दृष्टीनं त्या प्रयत्नशील आहेत.

प्रभा अत्रे ह्यांचा संगीतव्यासंग दांडगा आहे. त्यांनी केलेली मेहनत, स्वतःच्या बुद्धीनं स्वतंत्रपणे केलेला विचार व तो विचार हुकमतीने मैफलीतून मांडण्याचा त्यांचा आत्मविश्वासपूर्वक प्रयत्न ह्या सर्व गोष्टी जमेस धरूनही त्यांची गायकी आहे तशीच्या तशी मान्य करणं कठीण आहे असे विचार मनात येतात. जेमतेम तीन-चार वर्षे सुरेशबाबूंची तालीम त्यांना मिळाली. त्यानंतर शिष्यवृत्ती हिराबाईंच्या हाताखाली झाली. पण त्यानंतर म्हणजे १९५७ पासून त्यांना कोणाचीही तालीम घेण्याची जरुरी वाटली नाही ह्याचं आश्चर्य वाटते. सुरेशबाबूंनी फार चांगली तालीम दिली हे मान्य. त्यांनी एक अनमोल मंत्र दिला की आपली गायकी

पृष्ठ ३९ वर



# स्वतःची ओळख पटली तर?

वसंत डोंगरगावकर

माणसाच्या जीवनप्रवाहाला केव्हा आणि कशी कलाटणी मिळेल याचा नेम नाहीं.

मी तेव्हा शिकागोत मानवी स्वभाववैशिष्ट्याच्या अभ्यासात गढलो होतो.

एके दिवशी एक दरिद्री आणि फाटका दिसणारा माणूस खास भेटीसाठी माझ्या प्रयोगशाळेत आला. खिशातून एक छोटेखानी पुस्तक बाहेर काढीत मला म्हणाला, ' सर, मुद्दाम तुमच्या भेटीसाठी येथपर्यंत आलो आहे. हे तुम्हीच लिहिलेलं पुस्तक

ना ? काल संध्याकाळपर्यंत मी आत्महत्येच्या काठावर उभा होतो. तुमच्या या पुस्तकानं मला आशेची दिशा दाखवून तुमच्या पुढ्यात आणून उभं केलं आहे. सर, या अभाग्याला तुमच्या मदतीचा हात मिळेल का ? मोठ्या आशेनं आलो आहे.'

तो दीनवाणा होऊन भरभर बोलत असता मी पायापासून डोक्यापर्यंत त्याचे निरीक्षण केले. त्याची खुंट खुंट वाढलेली दाढी, चेहऱ्यावरील नैराश्याचे स्पष्ट भाव आणि हातापायांच्या हतोत्साह हालचाली बघून या प्राण्याला आपण मदतीचा हात देऊ शकू असे काही केल्या वाटेना !

तरीपण मी त्यास खुर्चीत बसून सगळी कौटुंबिक व व्यावसायिक माहिती इत्थंभूत कथन करण्यास सांगितले. त्याने बराच वेळपर्यंत आपली व्यथा बारीकसारीक तपशिलासह प्रकट केली त्याचा सारांश असा : एका छोट्या उत्पादक व्यवसायात त्याने आपली सारी पुंजी गुंतवली होती, पण दुर्दैवाने महायुद्ध पेटताच कच्च्या मालाचा पुरवठा बंद पडून त्याचा व्यवसाय बसला. त्या हादऱ्याने त्याने आपल्या कौटुंबिक जीवनाकडे पाठ फिरविली आणि आज तो आत्महत्येच्या विचाराच्या काठावर येऊन ठेपला होता.

त्याची ही मानसिक व्यथा एकाग्रचित्ताने श्रवण करून मी म्हटले, 'ही तुझी परिस्थिती विकट खरीच. पण मी तुला काही मदत करू शकेन असं वाटत नाही.'

हे शब्द कानी पडताच त्याच्या चेहऱ्यावरचा असला नसला तजेला पार नाहीसा झाला. घोर निराशेने त्याने मान खाली घातली.

काही क्षण वाट बघून मी म्हणालो, 'हे बघ, या इमारतीत एक माणूस आहे. त्याच्याशी तुझी गाठ घालून देईन. तो तुला निश्चितच संकटाच्या गर्तेतून बाहेर काढील, याची मला पुरती खात्री आहे.'

यावर त्या समोरच्या फाटक्या माणसाने खुर्चीतून अक्षरशः उडी मारली आणि माझे दोन्ही हात घट्ट आवळीत तो अधीरतेने म्हणाला, 'चला. भेट करून द्या ना त्याची.'

मला आशेचा किरण दिसला.

आणि त्याला हाताशी धरून मी माझ्या प्रयोगशाळेत नेले.

एका पडद्यासमोर उभा करून मी पडदा सारला तो उंचच उंच आरशात त्याला आपली संपूर्ण प्रतिमा दिसली.

त्याच्या त्या प्रतिमेकडे बोट दाखवीत मी त्यास म्हटले, 'हाच तो माणूस. या माणसाला तू चांगले जाणल्याशिवाय जीवनात तुझे काही मोल होईल असे मला वाटत नाही.'

मी त्याच्या प्रतिक्रियेची वाट बघू लागलो.

तो धिमी पावले टाकीत आपल्या प्रतिमेनिकट गेला, दोन्ही हातांनी दाढी वाढलेला चेहरा रगडला, एकवार आरशातला 'माणूस' काही क्षण नखशिखान्त

न्याहाळला आणि बाजूस सरून खाली मान घालून बघता बघता रडू लागला !

पुरता नैराश्याच्या खाईत गाडल्या गेलेल्या या माणसाला बाहेर पडता येईल असे काही मला वाटले नाही. मी त्याची कशीबशी बोळवण केली.

काही दिवस लोटले.

आणि एके दिवशी ध्यानीमनी नसता अचानक तो माणूस मला रस्त्यात भेटला. त्याचे ते अंतर्बाह्य परिवर्तन बघून मी चकित झालो.

' मी आता तुमच्याकडेच निघालो होतो, ' अशी प्रस्तावना करून त्याने आपला उज्ज्वल जीवनवृत्तान्त कथन केला.

त्याला वार्षिक तीन हजार डॉलर्सची नोकरी मिळाली होती आणि काही दिवसांतच माझी ' मार्गदर्शनाची फी ' म्हणून कोरा चेक माझ्या हाती देण्याचा त्याचा मानस होता !

त्या माणसाने पाठ वळविली आणि बघता बघता झपझप पावले टाकीत तो गर्दीत मिसळून गेला.

मला पहिल्यांदाच माणसाच्या सुप्त मनाच्या प्रचंड कार्यशक्तीचा अशा रीतीने अनुभव आला.

मी माझ्या प्रयोगशाळेतल्या त्या आरशापुढे येऊन उभा ठाकलो आणि ती प्रतिमा बघत मी मनोमन माझे जीवित-ध्येय निश्चित केले, की जगातल्या साऱ्या आबालवृद्धांना त्यांच्या मनाची प्रचंड कार्यशक्ती निदर्शनास आणून देण्याच्या कार्यास आपण वाहून घ्यावयाचे.

अव्याहत पंचवीस वर्षांच्या धडपडीचा परिपाक म्हणजे ' द लॉ ऑफ सक्सेस ' हा माझा ग्रंथ.

त्या व्यथित फाटक्या माणसाची सत्यकथा अर्धवटच सांगून झाली की !

आपली ' ती प्रतिमा ' बघून रडणारा माणूस—तो आज एका अवाढव्य अमेरिकन व्यावसायिक कंपनीचा अध्यक्ष आहे !

[ ' द लॉ ऑफ सक्सेस ' या नेपोलियन हिलच्या जगद्विख्यात ग्रंथातून. ]






द गॉलच्या राजकीय जीवनातील अज्ञातवासाचा कालखंड आता सुरू झालेला होता.

हा अज्ञातवास जसा तत्कालिन परिस्थितीने त्याच्यावर लादला होता, तसा काही प्रमाणात, त्याचा स्वभावही कारणीभूत झालेला होता. युरोपबरोबरच

# उत्तरार्ध : लेखांक सहा

फ्रान्सने युद्ध-पर्वातून शांति-पर्वामध्ये प्रवेश केला होता. बदलत्या परिस्थितीबरोबर फ्रान्सपुढील प्रश्नांचे स्वरूपही पालटले होते. देशातील राजकीय परिस्थितीने वेगळे रूप धारण केलेले आहे, हे सारा जन्म सैनिकी पेशात व्यतीत केलेल्या द गॉलला समजत नव्हते असे नाही; परंतु तो ज्या लष्करी परंपरेमध्ये वाढला होता त्या परंपरेच्या संस्कारांपासून दूर जायला त्याच्या मनाची तयारी नव्हती. एकाने हुकूम सोडावा आणि इतरांनी तो निमूटपणाने ऐकावा एवढा एकच अनुभव तो गेली चाळीस वर्षे घेत होता.

महायुद्धाची सांगता होईपर्यंत फ्रान्सने द गॉलची ही एककल्ली वृत्ती सहन केली. परंतु आता एका व्यक्तीची मातबरी उरलेली नाही. अनेक राजकीय पक्ष सत्तेत वाटा मिळविण्यासाठी लोकांपुढे आपापले कार्यक्रम मांडीत होते आणि फ्रान्सच्या राजकीय जीवनावर आपले वर्चस्व प्रस्थापित व्हावे यासाठी ते आपापल्या कुवतीनुसार डावपेच लढवीत होते.

या परिस्थितीला कंटाळून द गॉलने आकस्मिक रीतीने प्रधानमंत्रीपदाचे त्यागपत्र दिले आणि 'युद्धकालीन आठवणी' लिहिण्यासाठी तो आपल्या खेडेगावी परतला.

दुसऱ्या महायुद्धाला प्रारंभ झाल्यानंतर, वर्षभराच्या आतच तिसरे प्रजासत्ताक कोसळले होते आणि अद्याप चौथ्या प्रजासत्ताकाची रीतसर उभारणी व्हायची होती. या मधल्या काळात समाजवादी, साम्यवादी आणि एम. आर. पी. या नावाने ओळखण्यात येत असलेला जुना ख्रिश्चन डेमोक्रॅटिक अशा तीन पक्षांनी संमिश्र मंत्रिमंडळ स्थापन केले होते. द गॉलच्या त्यागपत्रानंतर प्रधानमंत्रीपदावर फेलिक्स गोई या समाजवादी नेत्याची नियुक्ती झाली. द गॉलइतका त्याचा स्वभाव उग्र नसल्यामुळे लोकांना हायसे वाटले.

महायुद्धाच्या समाप्तीनंतरची पहिली दोन वर्षे फ्रान्सला आर्थिक दृष्टीने अतिशय वाईट गेली. कारखान्यांतील उत्पादन मंदावले होते, लष्करी सेवेतून निवृत्त झालेल्या तरुणांना बेकारीचे भूत भेडसावू लागले होते, फ्रँकची किंमत घसरली असल्यामुळे महागाईचा राक्षस अक्राळविक्राळ स्वरूप धारण करू लागला होता. सगळेच काही विस्कळीत झालेले होते. लोकांना जीवनावश्यक वस्तू वाजवी भावाने मिळाव्यात यासाठी शिधा-नियंत्रण अमलात आलेले असले तरी काळ्या बाजाराला

ऊत आल्यामुळें ही सारी व्यवस्था कुचकामी ठरली होती. साखर तर फार मोठ्या प्रमाणावर काळ्या बाजारात गेली होती. त्यामुळे सरकारला साखरेची परदेशांतून आयात करणें भाग पडले. या आयातीसाठी पैसा कसा उभारायचा हा प्रश्न सुटलेला नव्हता.

अशा परिस्थितीत अमेरिकेकडे याचना करणे एवढाच फ्रान्सपुढें पर्याय उरला होता. १९४५ च्या ऑगस्टमध्ये जपानबरोबरच्या महायुद्धाची समाप्ती झाल्यानंतर अमेरिकेने डिसेंबरच्या प्रारंभी फ्रान्सला कोटचवधी डॉलर्सचे कर्ज दिले होते हे खरे असले तरी तेवढचाने फ्रान्सची गरज भागणारी नव्हती. म्हणून प्रधानमंत्री गोईं याने लिआँ ब्लूम याला अमेरिकन सरकारशी वाटाघाटी करण्यासाठी वॉशिंग्टनला धाडले. ब्लूम अमेरिकेकडून आणखी पासष्ट कोटी डॉलर्सचे कर्ज मिळविण्यात यशस्वी झाला. परंतु या कर्जाबाबतच्या अमेरिकेच्या अटी कडक होत्या. म्हणून अमेरिकन परराष्ट्र खात्याच्या अधिकाऱ्याला ब्लूम म्हणाला, 'या अटी तुम्ही थोड्याशा शिथिल केल्या पाहिजेत.'

अमेरिकन अधिकारी उत्तरला, 'जोपर्यंत तुमच्या मंत्रिमंडळात साम्यवादी सदस्य आहेत तोपर्यंत फ्रान्सबाबत उदार धोरण स्वीकारणं आम्हांला अशक्य आहे.'

अमेरिकन अधिकाऱ्याचे हे उत्तर ब्लूमला पटले. परंतु जोपर्यंत फ्रान्समध्ये स्थिर राजवट निर्माण होत नाही तोपर्यंत कम्युनिस्टांना दुखवून चालणार नाही या अगतिकतेपायी ब्लूम गप्प बसला.

फ्रान्सला आपली अंतर्गत आर्थिक परिस्थिती सुधारण्यावर लक्ष द्यावे लागत असतानाच, जर्मनीच्या भवितव्याकडे बारीक नजर ठेवणे भाग होते. रशियाच्या ताब्यातील पूर्व जर्मनीमध्यें कम्युनिस्ट राजवट येणार हे आता स्पष्ट झाले होते. त्यामुळें अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या ताब्यातील पश्चिम जर्मनीला स्वातंत्र्य द्यावे असा विचार अमेरिकन नेते व्यक्त करू लागले होते. जर्मनीला आज ना उद्या तिचे स्वातंत्र्य परत द्यावे लागणार आहे ही वस्तुस्थिती फ्रान्स डोळ्यांआड करू शकत नव्हता. परंतु त्याबरोबरच जर्मनीचे सामर्थ्य बेसुमार वाढता कामा नये याचीही त्याला दक्षता घेणे राष्ट्रीय सुरक्षिततेच्या दृष्टीने अपरिहार्य झाले होते. म्हणून परराष्ट्रमंत्री जॉर्ज बिदॉ याने, जर्मनीपासून ऱ्हाईनलँड तोडण्यात आला पाहिजे, सार प्रांताचा फ्रान्समध्ये समावेश करायला हवा आणि रूरवर आंतरराष्ट्रीय नियंत्रण प्रस्थापित करावे अशा मागण्या मांडायला प्रारंभ केला. पश्चिम जर्मनी पूर्णपणे खच्ची होणे अमेरिकेला मानवण्यासारखे नव्हते. त्यामुळे अमेरिकेने फ्रान्सच्या या मागण्या फेटाळून लावल्या. परराष्ट्रमंत्र्यांच्या बैठकीमध्ये रशिया तरी आपल्या मागण्यांचा पाठपुरावा करील अशी फ्रेंच नेत्यांची जी अपेक्षा होती तीही खरी ठरली नाही.

एकीकडे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये फ्रान्स आपल्या कुवती-

प्रमाणे आपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करीत असतानाच चौथ्या प्रजासत्ताकाची घटना तयार करण्याचे कार्य सुरू होते. घटना समितीने तयार केलेल्या मसुद्यावर ५ मे १९४६ या दिवशी देशभर सार्वमत घेण्यात आले. या मसुद्यामध्ये राष्ट्राध्यक्षाऐवजी संसदेला जादा अधिकार दिलेले असल्यामुळे या घटनेचा आधार घेऊन कम्युनिस्ट पक्ष आपले वर्चस्व वाढवील या भीतीपायी सार्वमतामध्ये या मसुद्याला पुरेसा पाठिंबा मिळू शकला नाही.

राजकीय पक्षांचे महत्त्व वाढविणारी घटना द गॉलला मंजूर होणे शक्यच नव्हते. राष्ट्राध्यक्ष हा नामधारी राष्ट्रप्रमुख न राहता सर्व अधिकार त्याच्या हाती केंद्रित झाले असले पाहिजेत या आग्रहाचा त्याने यावेळीही पुरस्कार केला. परंतु राजकीय पक्षनेत्यांना नेमके तसे घडायला नको होते म्हणूनच त्यांनी संसद आणि मंत्रिमंडळ यांना महत्त्व देणारा मसुदा हेतुतःच तयार केला होता. राजकीय पक्षांच्या या कारवाईचा द गॉलला इतका राग आला की, ८ मेच्या पॅरिस येथल्या विजय-संचलनालाही तो हजर राहिला नाही.

घटनेचा पहिला मसुदा सर्वमतात फेटाळण्यात आल्यामुळे जूनमध्ये दुसऱ्या घटना समितीची निवड करण्यात आली. यावेळीही द गॉल निवडणुकीपासून दूर राहिला. कारण ही दुसरी घटना समितीही फारसा वेगळा मसुदा तयार करणार नाही हे त्याला माहीत होते आणि घडलेही तसेच. दुसऱ्या मसुद्याचा तोंडवळा पहिल्या मसुद्यासारखाच होता. 'या घटनेने राजकीय पक्षांना वाजवीपेक्षा जास्त महत्त्व मिळणार आहे आणि म्हणून ही घटना मला मान्य नाही. राष्ट्राध्यक्ष हाच सर्वसूत्रधार असला पाहिजे' हे आपले मत द गॉलने लपवून ठेवले नसले तरी संसदीय लोकशाहीसाठी आसुसलेल्या फ्रान्सने द गॉलच्या विरोधाची मुळीच दखल घेतली नाही. तेरा ऑक्टोबरच्या सार्वमताने या मसुद्यावर मान्यतेचे शिक्कामोर्तब केले.

या घटनेनुसार चौथ्या प्रजासत्ताकाच्या पहिल्या लोकसभेची निवडणूक दहा नोव्हेंबर रोजी घेण्यात आली. जेव्हा सर्वसामान्य जनता आर्थिक समस्यांनी वेढलेली असते तेव्हा ती साम्यवादाकडे आकर्षिली जाते. या पक्षाची आर्थिक समृद्धीबद्दलची भरघोस आश्वासने वाचायला आणि ऐकायला मोठी मोहक असतात. त्यामुळे युद्धामुळे खिळखिळ्या झालेल्या फ्रान्सने पंचावन्न लाख मते देऊन कम्युनिस्ट पक्षाला अग्रस्थान दिले. 'एम. आर. पी.'ला पन्नास लाख व समाजवादी पक्षाला चौतीस लाख मते पडली. यामुळे त्रिपक्षीय मंत्रिमंडळाचा प्रयोग आणखी काही काळ चालू ठेवणे हे ओघानेच आले. त्याचप्रमाणे कम्युनिस्ट पक्षाला सर्वांत जास्त मते मिळालेली असल्यामुळे थोरेझ वा कम्युनिस्ट नेत्याची प्रधानमंत्रीपदी नियुक्ती करणे भाग होते. परंतु फ्रेंच लोकसभा सावध होती. प्रधानमंत्रीपदावर कम्युनिस्ट नेता आरूढ झाला की फ्रान्सला अमेरिकेकडून मिळणारी मदत बंद होईल आणि त्या प्रमाणात रशियाकडून मदत मिळणार नाही असा चाणाक्ष विचार करून फ्रेंच लोकसभेने

थोरेझ याला प्रधानमंत्रीपद द्यायला विरोध केला. यातून तडजोड निघण्याचे लक्षण दिसेना. म्हणून शेवटी, तडजोडीचा पर्याय पुढे आला आणि त्यानुसार राष्ट्राध्यक्षाची निवड होईपर्यंत लिआँ ब्लूम याच्या नेतृत्वाखाली हंगामी मंत्रिमंडळ बनविण्यात आले.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात फ्रान्सने विशेष मर्दुमकी केलेली नसली तरी ब्रिटन आणि अमेरिका यांच्या प्रयत्नांमुळे फ्रान्सचे उत्तर आफ्रिकेतील आणि आग्नेय आशियातील साम्राज्य अबाधित राहिले होते. जपानने आग्नेय आशियामध्ये मुसंडी मारून तेथील सारा प्रदेश झपाट्याने जिंकून घेतला होता. त्यावेळी फ्रेंच साम्राज्यातील इंडोचीनही जपानी वर्चस्वाखाली गेलेला होता. या जपानी वर्चस्वाविरुद्ध व्हिएटनाममध्ये हो-चि-मिन्हच्या नेतृत्वाखाली कणखर लढा देण्यात आलेला होता. जपानचा पराभव होऊन इंडोचीन पुन्हा फ्रान्सच्या ताब्यात आल्यानंतर हो-चि-मिन्हने प्रवर्तित केलेली व्हिएटनामच्या आणि पर्यायाने इंडोचीनच्या स्वातंत्र्याची चळवळ दबून राहणे शक्यच नव्हते. फ्रान्सशी वाटाघाटी करून आपल्याला स्वातंत्र्य मिळवणे शक्य आहे अशी प्रारंभी हो-चि-मिन्हची कल्पना होती. परंतु कोणतेच राष्ट्र आपल्या साम्राज्यावर पाणी सोडायला तयार होत नाही. हे असे वर्चस्व हा राष्ट्राच्या अस्मितेचा एक अपरिहार्य घटक झालेला असतो. फ्रान्सबाबत हो-चि-मिन्हला तोच अनुभव आला. त्यामुळे वीस डिसेंबर १९४६ या दिवशी हो-चि-मिन्हने फ्रेंच वर्चस्वाविरुद्ध युद्ध पुकारले. इंडोचीनमधील हे युद्ध पुढे आठ वर्षे चालले आणि १९६४ मध्ये दिएन बिएन फू येथे आपला निर्णायक पराभव झाल्यानंतरच फ्रान्सने आग्नेय आशियातून आपले अंग काढून घेतले.

हो-चि-मिन्हने १९४६ च्या अखेरीला युद्धाचा पुकारा करताच, इंडोचीनबाबत आपण कोणते धोरण स्वीकारावे यासंबंधी त्रिपक्षीय मंत्रिमंडळामध्ये मतभेद होते. या मतभेदापायीच लिआँ ब्लूम याला बाजूस व्हावे लागले आणि फ्रान्सच्या प्रधानमंत्रीपदावर पौल दमादिग् आरूढ झाला. परंतु कम्युनिस्टांचे दमादिग् याच्याशीही पटले नाही आणि १९४० च्या एप्रिलमध्ये कम्युनिस्ट पक्ष फ्रेंच मंत्रीमंडळातून बाहेर पडला.

मध्यंतरीच्या काळात चौथ्या प्रजासत्ताकाच्या पहिल्या राष्ट्राध्यक्षाची निवड होऊन ते पद व्हिसेंट ऑरिएल याच्याकडे आलेले होते. त्यामुळे गेले वर्षभर गाजत असलेला आणि भिजत पडलेला प्रश्न निकालात निघाला. राष्ट्राध्यक्षाच्या निवडीमुळे चौथ्या प्रजासत्ताकाला महत्त्वपूर्ण आधार प्राप्त झाला. हे पद अधिक महत्त्वपूर्ण व्हायला हवे हा द गॉलचा आग्रह यावेळीही कायम होता. हिटलर-मुसोलिनीसारखी सर्वंकष हुकूमशाही आणि ब्रिटनची संसदीय लोकशाही या भिन्नभिन्न शासनपद्धतींचा समन्वय केल्याने दोन्ही पद्धतींचे फायदे मिळू शकतात असे त्याला वाटत होते. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्षपद हे त्याच्या कल्पनेचे प्रतीक होते आणि म्हणून दैनंदिन

राजकारणापासून दूर गेल्यानंतरही तो आपला हा विचार आग्रहाने व्यक्त करीत असे.

व्हिएटनाममधील युद्धाच्या निमित्ताने कम्युनिस्ट पक्ष मंत्रिमंडळातून बाहेर पडला याने द गॉलला आनंद होणे स्वाभाविक होते. कम्युनिस्ट विचारप्रणाली राष्ट्रवादाची विरोधक असल्यामुळे द गॉल यास ही विचारप्रणाली समर्थ फ्रान्सच्या निर्मितीला घातक ठरेल असे प्रारंभापासून वाटत होते आणि म्हणूनच कम्युनिस्टांचे सत्यस्वरूप जनतेसमोर मांडण्यासाठी त्याने चौदा एप्रिल १९४७ रोजी 'रॅली ऑफ दी फ्रेंच पीपल' या संघटनेची मुहूर्तमेढ रोवली. या निमित्ताने कम्युनिस्टांसंबंधीची आपली भूमिका विशद करताना तो म्हणाला, 'कम्युनिस्ट फुटीर प्रवृत्तीचे आहेत म्हणून फ्रेंच कामगारांनी त्यांच्यापासून दूर राहिले पाहिजे, असं मला वाटतं.'

द गॉलने 'रॅली' स्थापन केल्यानंतर सहा महिन्यांनी फ्रान्सभर नगरपालिकांच्या निवडणुका झाल्या आणि त्या निवडणुकांसाठी त्याने 'रॅली'च्या वतीने उमेदवार उभे केले. या निवडणुकीत 'रॅली ऑफ दी फ्रेंच पीपल' या संघटनेला चाळीस टक्के मते मिळाली हे खरे; पण गमतीची गोष्ट अशी की कम्युनिस्टांची मते मात्र कमी झाली नाहीत. उलट एम. आर. पी. सारखे उजवे पक्षच या निवडणुकीत पराभूत झाले. द गॉलच्या 'रॅली'ने अवघ्या सहा महिन्यांच्या आत स्पृहणीय यश मिळवावे. याचे बऱ्याच जणांचा आश्चर्य वाटले. 'न्यूयॉर्क टाईम्स'ने तर 'द गॉलचा चमत्कार' असा या यशाचा उल्लेख केला,

परंतु या यशाचा द गॉलला म्हणावा तसा काहीच उपयोग झाला नाही. कारण आदल्याच वर्षी लोकसभेच्या निवडणुकी झालेल्या असल्यामुळे आणखी चार वर्षे तरी लोकसभेचा दरवाजा त्याच्या पक्षासाठी बंद झालेला होता.

त्यातच द गॉलच्या हातून एक मोठी चूक झाली. तो प्रत्येक भाषणामध्ये चौथ्या प्रजासत्ताकाच्या घटनेवर आणि ही घटना राबवीत असलेल्या लोकसभेवर जोरदार टीका करू लागला. तिसऱ्या प्रजासत्ताकाच्या अस्थिर राजकारणाचा वारसा चौथ्या प्रजासत्ताकानेही जोपासला होता हे खरे आहे. त्यामुळे ऋतू बदलावा तशी मंत्रिमंडळे बदलली जात होती. युरोपीय राजकारणामध्ये फ्रेंच लोकशाहीचे हसे होत होते. फ्रेंच जनतेला ही वस्तुस्थिती समजत नव्हती असे नाही. तरीदेखील द गॉलने घटनेची आणि लोकसभेची निर्भर्त्सना करण्याचे व्रत घ्यावे ही गोष्ट फ्रेंच लोकांना आवडली नाही आणि त्यामुळेच नगरपालिकांच्या निवडणुकीमध्ये यश मिळूनही द गॉलला लोकमत आपलेसे करता आले नाही.

केवळ स्वतःवर विश्वास ठेवणाऱ्या या माणसाची लोकप्रियता झपाट्याने ओसरू लागली.

१९४२ साल उजाडले तेव्हा अमेरिका आणि रशिया यांच्यांतील शीतयुद्धाला चांगलेच तोंड लागले होते. या दोन्ही बलाढ्य सत्ता आपापले नियंत्रण-क्षेत्र वाढ-

विण्याच्या उद्योगाला लागल्या होत्या. हिटलरच्या पराभवानंतर पूर्व युरोपातील सर्व लहान राष्ट्रांचा घास गिळण्यासाठी स्टॅलिनची पावले द्रुतगतीने पडत होती. ज्या पद्धतीने हिटलरने चेकोस्लोव्हाकियावर आपली पकड प्रस्थापित केली होती, तसेच तंत्र वापरून स्टॅलिन जागोजाग रशियाची हस्तक-सरकारे निर्माण करीत चालला होता. रशियाने बर्लिनची नाकेबंदी केली तेव्हा तर अमेरिका आणि रशिया यांच्यांतील सामर्थ्य-स्पर्धा पराकोटीला पोहोचली. साहजिकच अमेरिका पश्चिम युरोपला आपल्याकडे सोपविलेला ' विश्वस्त प्रदेश ' आहे अशा भावनेने वागवू लागली.

द गॉलच्या महत्त्वाकांक्षी वृत्तीला अमेरिकेचे हे वर्तन मान्य होणे शक्यच नव्हते. फ्रान्सने अमेरिकेचे हस्तक म्हणून वावरता कामा नये, उलट अमेरिका आणि रशिया या दोन समर्थ सत्तांच्या लढतीमध्ये तिसरी शक्ती म्हणून फ्रान्सला त्याचे रास्त महत्त्व प्राप्त झाले पाहिजे असे त्याला राहून राहून वाटत होते.

परंतु त्याचा हा विचार फ्रेंच लोकमताला रुचणे शक्य नव्हते.

याचे मोठे कारण असे की, १९४२ पासून मार्शल योजनेनुसार फ्रान्सला अमेरिकेकडून फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक साहाय्य होत होते. या मदतीमुळेच फ्रान्स आर्थिक अरिष्टातून बाहेर आला. सर्वसामान्य नागरिकाचे जीवनमान बरेच सुधारले होते. साहजिकच लोकांना आहे ही परिस्थिती बरी आहे असे वाटू लागले होते. द गॉलसारखा लहरी आणि विक्षिप्त माणूस अधिकारावर आला तर अमेरिकेची मदत बंद होऊ शकेल, निदान ती सध्या मिळते आहे तेवढी ती मिळणार नाही अशी लोकांना साधार भीती वाटत होती. त्यामुळे त्यांना द गॉलच्या समर्थ नेतृत्वापेक्षा संमिश्र मंत्रिमंडळाची निसरडी राजवट बरी वाटत होती.

फ्रान्सच्या अर्थकारणावर अमेरिकेचे वर्चस्व वाढत आहे याचा दररोज प्रत्यय येऊ लागल्यानंतर द गॉलने आपल्या जर्मनीविषयीच्या धोरणाचा सूर बदलला. आतापर्यंत तो जर्मनीच्या स्वातंत्र्याला विरोध करीत होता. त्याऐवजी फ्रान्स आणि जर्मनी यांनी एकत्र येऊन अमेरिकेच्या युरोपमधील वर्चस्वाला शह दिला पाहिजे अशी भाषा तो बोलू लागला. फ्रान्स आणि जर्मनी यांचे संघराज्य करावे या ॲडेनॉवर यांच्या सूचनेचा द गॉलने पाठपुरावा करण्यामागे त्याचा अमेरिकन वर्चस्वाला विरोध हेच मुख्य कारण होते. ॲटलांटिकपासून उरलपर्यंतच्या युरोपची जुन्या शार्लेमान साम्राज्याच्या धर्तीवर उभारणी करण्यात आली पाहिजे असेही तो म्हणू लागला. १९५० मध्ये कोरियात अमेरिका आणि रशिया यांच्यांतील संघर्षाची ठिणगी पेटल्यानंतर तर द गॉलने फ्रँको-जर्मन सहकार्याचा अट्टाहासाने पुरस्कार आरंभिला.

१९५१ च्या जूनमध्ये लोकसभेच्या निवडणुका झाल्या तेव्हा त्यांत द गॉलच्या ' रॅली 'ने पुन्हा एकदा लोकमताचा अंदाज घेतला. परंतु त्या निवडणुकीत लोकसभेच्या सहाशे सत्तावीस जागांपैकी अवघ्या एकशेसतरा जागाच ' रॅली 'ला मिळाल्या

आणि तेव्हापासून ' रॅली 'च्या लोकप्रियतेला जबरदस्त ओहोटी लागली.

द गॉलला हा आघात सहन झाला नाही. ' आपण सार्वजनिक जीवनातून निवृत्त होत आहोत, ' असे त्याने जाहीर केले.

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर ज्याप्रमाणे आशिया खंडामध्ये वसाहतवादाविरुद्ध जोराची लाट आली तशीच ती आफ्रिका खंडामध्येही उसळ्या मारू लागली होती. विशेषतः महायुद्धात पराभूत झालेल्या फ्रान्सला आपल्यावर साम्राज्य गाजविण्याचा मुळीच अधिकार नाही असे उत्तर आफ्रिकेतील अनेक राष्ट्रांना वाटू लागले. त्यांत अल्जेरिया आघाडीवर होता. इंडोचीनमध्ये फ्रान्सचा धुव्वा उडाल्यानंतर त्याची उरलीसुरली प्रतिष्ठाही विरून गेली. अल्जेरियातील मुस्लिम नागरिकांची गनिमी पथके तेथील फ्रेंच सैनिकांवर छुपे हल्ले चढवू लागली. या हल्ल्यांचा सूड घेण्यासाठी अल्जेरियातील फ्रेंच सेनाधिकारी मुस्लीम वस्त्यांवर गोळीबार करू लागले.

तद्देशीय जनतेची स्वातंत्र्याकांक्षा बंदुकीच्या बळावर दडपून टाकण्याचे दिवस इतिहासजमा झालेले आहेत ही गोष्ट ध्यानात घ्यायला अल्जेरियातील फ्रेंच सेनाधिकाऱ्यांची मुळीच तयारी नव्हती.

टचुनिशियातील साखिएत हे खेडेगाव अल्जेरियाच्या सीमेजवळ आहे. अल्जेरियन बंडखोरांनी आपले गुप्त केंद्र या खेडेगावात उभारले होते. पंधरा जानेवारी १९५७ या दिवशी अल्जिरियन बंडखोरांनी साखिएतमधून बाहेर पडून अल्जिरियन सीमेवरील फ्रेंच सैनिकांवर जोराचा हल्ला चढविला. या अनपेक्षित हल्ल्यामध्ये अनेक फ्रेंच सैनिक ठार झाले. ही बातमी पॅरिसला पोचली तेव्हा तेथें मोठीच खळबळ उडाली. फ्रेंच लोकसभेच्या वीस जानेवारीच्या बैठकीमध्ये या प्रकारासंबंधी कडाक्याची चर्चा झाली. अल्जिरियन बंडखोरांना नेस्तनाबूत करण्यासाठी तेथील फ्रेंच सेनेला आणखी मदत पाठविली पाहिजे अशी अनेक सदस्यांनी मागणी केली. त्याचप्रमाणे अल्जिरियन बंडखोरांना आसरा देणाऱ्या टचुनिशियाबरोबरचे संबंध तोडून टाकले पाहिजेत असाही काहीजणांनी आग्रह धरला. त्यावेळी गैलार्द प्रधानमंत्री होता. अल्जिरियातील बंडाळीचा बीमोड करण्याइतका तो कणखर नाही असे अनेकांना वाटू लागले. लोकसभेतील गॉलवादी सदस्य दोन लोकांना सांगू लागला, ' अल्जिरियातील युद्ध थांबवून मोरोक्को आणि टचुनिशिया यांना योग्य मार्गावर आणण्याचं कार्य एकटा द गॉलच करू शकेल. '

द गॉलचे नाव पुन्हा एकदा ऐकू येऊ लागले.

सोत्सेल या दुसऱ्या एका गॉलवादी संसदसदस्याने तर प्रधानमंत्री गैलार्द यांच्याविरुद्ध प्रचार-मोहीमच उघडली. तो म्हणाला, ' गैलार्द सरकार अमेरिकेच्या हातचं बाहुलं आहे. टचुनिशियाच्या पाठीशी अमेरिका उभी असल्यामुळेच गैलार्द टचुनिशियाविरुद्ध उपाययोजना करायचं टाळत आहे. अरब राष्ट्रे रशियाच्या कच्छपी लागू

नयेत म्हणून अमेरिका फ्रान्सच्या हितसंबंधांवर निखारा ठेवून अरब राष्ट्रांना संरक्षण देत आहे. आपलं परराष्ट्र खातं तर इतकं अमेरिकेच्या आधीन गेलेलं आहे की अल्जिरियन युद्धातून फ्रान्स वाचू शकणार नाही असे केविलवाणे उद्गार ते काढू लागले आहे.

अल्जिरियातील फ्रेंच सरसेनानी जनरल सलान हा कमालीचा हेकेखोर माणूस होता. अल्जिरियन बंडखोरांना धडा शिकविण्यासाठी त्याने आठ फेब्रुवारी रोजी साखिएत खेड्यावर बाँबहल्ला केला. या अमानुष हल्ल्यामध्ये पंचाहत्तर ट्युनिशियन नागरिक ठार झाले. त्यातील तीस तर शाळकरी मुले होती.

सलानची ही अरेरावी ट्युनिशियाला सहन होणे शक्यच नव्हते. ट्युनिशियाचा अध्यक्ष बोर्गिबा याने तावडतोब जाहीर केले–'आमच्या देशातल्या फ्रेंच सैनिकांनी तावडतोब इथून चालतं व्हावं.'

साखिएतवरील बाँबहल्ल्याबाबत संयुक्त राष्ट्रसंघाकडे तक्रार न्यावी असाही त्याचा विचार होता. परंतु अमेरिकेने त्याला थोपविले. फ्रान्स आणि ट्युनिशिया यांच्यांतील संघर्ष चिघळणे अमेरिकेच्या दृष्टीने सोयीचे नव्हते. तरीदेखील आपल्या देशातील फ्रेंच सेनेने यापुढे बराकीबाहेर पडता कामा नये. असा बोर्गिबा याने हुकूम काढला. त्याचप्रमाणे बिझेर्टा बंदरामध्ये फ्रेंच जहाजांना आसरा मिळणार नाही, असेही त्याने जाहीर केले. बोर्गिबाने पॅरिसमधील मसमुदी या आपल्या राजदूतासही परत बोलावून घेतले. मसमुदी याने फ्रान्स सोडण्यापूर्वी द गॉलच्या गावी जाऊन त्याची भेट घ्यावी हा प्रकार थोडासा विचित्र वाटतो. द गॉलची भेट घ्यावी असे मसमुदी यास वाटण्याचे एकच कारण संभवते. उत्तर आफ्रिकेचा प्रश्न योग्य रीतीने सोडविण्यासाठी एकटा द गॉलच उपयोगी पडेल हे, गैलार्द–मंत्रिमंडळातील मेन्देस–फ्रान्स हा गॉलवादी मंत्री मसमुदींच्या मनावर सारखे बिंबवीत होता. त्यामुळेच पॅरिस सोडण्यापूर्वी द गॉलचे विचार जाणून घेण्याच्या उद्देशाने त्याची भेट घ्यायला मसमुदी प्रवृत्त झाला असावा.

साखिएतवरील बाँबहल्ला हा अशा रीतीने फ्रान्सच्या उत्तर आफ्रिकेतील साम्राज्याच्या आणि त्याचबरोबर द गॉलच्या भावी कार्याच्या दृष्टीने, कोणाच्याही ध्यानीमनी नसताना खूपच महत्त्वाचा ठरला.

साखिएत येथल्या घटनेने गैलार्द मंत्रिमंडळातील मतभेद आणखी जोराने धुमसू लागले. परराष्ट्रमंत्री पिनो म्हणाला, 'साखिएतवर बाँबवर्षाव करून आपल्या लष्करानं फार मोठी चूक केलेली आहे. अल्जेरियातील आपले सेनाधिकारी मर्यादा सोडून वागत आहेत याचा हा पुरावा आहे.'

स्वत: गैलार्द कमालीचा गोंधळून गेला होता. तरीही अकरा फेब्रुवारी रोजी भरलेल्या लोकसभेच्या बैठकीमध्ये त्याने जनरल सलान याच्या धोरणाचा पाठपुरावा केला. तेव्हा तर रॉबर्ट शुमन, एडगर फौद, पॉल रेनॉ यांच्यासारखे त्याचे मित्रही

खवळले. ' ल मोन्द ' या वृत्तपत्राने म्हटले, "पॅरिसची अल्जियर्स येथील सेनानींवर हुकमत चालत नसून अल्जियर्स येथल्या सेनानींच्या तंत्राने पॅरिस वागत आहे. '

गैलार्दवर फ्रान्सभर टीका होत असतानाच फ्रान्स आणि ट्युनिशिया यांच्या दरम्यान मध्यस्थी करण्यासाठी रॉबर्ट मर्फी आणि हॅरोल्ड बिली हे अनुक्रमे अमेरिका आणि ब्रिटन यांचे प्रतिनिधी ट्युनिशियामध्ये येऊन दाखल झाले. मर्फीने बोर्गिबाची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला. तरीदेखील बोर्गिबाने आपला आग्रह सोडला नाही. तो मर्फीला म्हणाला, ' ट्युनिशियातील फ्रेंच सैन्य बाहेर पडलं पाहिजे आणि अल्जिरिया आंतरराष्ट्रीय नियंत्रणाखाली आणण्यात यावा या माझ्या मागण्या कायम आहेत. "

बोर्गिबा आणि मर्फी यांच्यात चर्चा सुरू असल्याची बातमी पॅरिसला येताच, उत्तर आफ्रिका आपल्या घशात घालण्याचा अमेरिकेचा प्रयत्न सुरू झालेला दिसतो अशी फ्रेंच वृत्तपत्रांनी टीका केली.

आधीच मर्फीविरुद्ध फ्रेंच जनमत कलुषित झालेले होते. १९४२ मध्ये अल्जियर्स येथे अमेरिकन प्रतिनिधी म्हणून काम करीत असताना मर्फीने दार्ला आणि जिराद या व्हिशीसरकारच्या हस्तकांशी वाटाघाटी केल्या होत्या. त्यांना हाताशी धरण्याचा प्रयत्न करून पाहिला होता. असा हा फ्रान्सच्या दृष्टीने बदनाम झालेला रॉबर्ट मर्फी फ्रान्स आणि ट्युनिशिया यांच्यांत समझौता घडवून आणण्यासाठी पाठविण्यात अमेरिकेची मोठीच चूक झाली. मर्फीच्या आगमनापायींच फ्रान्समधील लोकमत आणखी अमेरिकाविरोधी झाले आणि त्यामुळे लोकसभेमध्ये गैलार्द – मंत्रिमंडळाचा पराभव झाला.

तेरा मे रोजी आणखी एक घटना घडली.

अल्जियर्समधील संतप्त फ्रेंच तरुणांनी अमेरिका माहिती खात्याच्या इमारतीवर हल्ला चढवून बरीच नासधूस केली. तेथील फ्रेंच सेनानी जनरल सलान आणि मासू यांच्या चिथावणीवरून फ्रेंच सैनिकांनी अल्जियर्स नभोवाणी केंद्राचा ताबा घेतला. तेवढ्यावरच हे सेनानी थांबले नाहीत. त्यांनी कॉर्सिका बेटावर आपले छत्री सैनिक उतरविले. जनरल सलान पॅरिसवर चालून येणार आहे अशा वावड्या उठू लागल्या.

फ्रान्समध्ये भीतीचे वातावरण पसरले.

यावेळी साऱ्या देशाला तीव्रतेने आठवण झाली ती द गॉलची. राष्ट्राध्यक्ष कोती याने त्याला पॅरिसला बोलावून प्रधानमंत्रीपद स्वीकारण्याची विनंती केली.

एक जून १९५८ या दिवशी द गॉलकडे पुन्हा फ्रान्सची सूत्रे आली. द गॉल वाट पाहत होता त्या याच क्षणाची.

त्याचा बारा वर्षांचा अज्ञातवास आता संपलेला होता. फ्रान्स आणि द गॉल ही नावे पुन्हा परस्परांशी निगडित झाली होती.

( क्रमशः )

पदवीदान समारंभाचा दिवस. आपला मुलगा आज पदवीधर होणार. मंजू अतिशय आनंदात आहे.

आपल्या मुलांनी शिकावे व त्यांचा मानसन्मान वाढावा असे सर्वच मातांना वाटत असते.

परंतु मुले बरीच असल्यास सर्व मातापित्यांना आपल्या मुलांना अशी संधी देता येत नाही.

तुम्हीही तुमचे कुटुंब २ किंवा ३ मुलांपुरतेंच मर्यादित ठेवल्यास त्यांना चांगले शिक्षण देऊ शकाल.

कुटुंब नियोजनासाठी [illegible] आणि [illegible] जवळची कुटुंब कल्याण नियोजन [illegible] ही [illegible] लाल त्रिकोणाच्या खुणेने ओळखता येतात.

चांगल्या शिक्षणासाठी
कुटुंब
नियोजन

# सोनियाचा दिवस



पृष्ठ २४ वरून

आपल्या कुवतीप्रमाणे आपणच बनविली पाहिजे हेही मान्य केले तरी हेही कबूल केले पाहिजे की इतर शास्त्रांप्रमाणेच संगीतातील विचार रोजच्या रोज बदलत आहेत; प्रगत होत आहेत. नवीन नवीन येत आहेत. जुन्यातील काही मागे पडत आहेत. संगीतावर होणारे हे घात प्रत्याघात समजण्याकरता तरी संगीतातल्या ऋषीमुनींची नितांत जरुरी आहे. म्हणून आपल्या तोलामोलाचा गुरू करून त्यांच्या कडून तंथा घ्यावयास हवी. अन्यथा विचार जुनेच पण आपल्या एकट्याच्या बुद्धि-चातुर्यानं त्यांना कितीही निराळा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला तरी त्याचा चेहरा मोहरा कोणातरी पुराण पंडिताच्या कलाकृतीशी लावावा लागेल. प्रभा अत्रे 'जोग कंस' गातात तेव्हा कित्येकदा त्यातील काही जागा खटकतात. केवळ 'जोगकंस' हा राग ज्या मूळ रागांच्या समूहाने निर्माण झाला आहे, त्या रागांच्या चौकटीत ही 'जागा' बसते की नाही एवढेच म्हणून भागणार नाही तर हा राग निर्माण करणाऱ्या रचनाकाराच्या मनात ह्या रागासंबंधी एकसंधी, एकजिनसी सौंदर्य उभं करण्याचा विचार त्यानं कसा मांडला आहे ह्याला महत्त्व आहे. त्यातच त्या रागाचे सौंदर्य आहे. त्यातील निरनिराळ्या रागांना अलग करून किंवा एकाद्याच रागावर न्यास करून नाही. अशा 'मनस्वी' गाण्यानं प्रत्येक वेळी निराळा रंग भरेल पण त्या रागाची रसहानी जाणकार श्रोत्यांना निश्चित जाणवेल हेही तितकेच खरं.

वरील परखड विचार मी मांडीत असताना त्या अस्वस्थ होतील, मध्येच मला अडवतील अशी माझी स्वाभाविक कल्पना होती. पण तसं झालं नाही. उलट त्या शांत निःशब्द राहून मला आणखी बोलण्याला प्रोत्साहन देत होत्या, ह्याचे मला राहून राहून आश्चर्य वाटत होते. मी माझी सर्व मळमळ ओकून टाकली आणि त्यांच्या उत्तराची वाट पाहत स्तब्ध बसलो. तेव्हा त्या कोचावर सरसावून बसल्या मी घेतलेले आक्षेप आपण लीलया परतवून लावू अशा आत्मविश्वासानं त्या बोलू लागल्या.

'पहिली गोष्ट तुम्ही स्वतःला संगीताचे जाणकार नाही असं जे म्हणविता ते काही खरं नाही. संगीताची चांगली 'जाण' असल्याशिवाय तुम्ही दाखवीत असलेले बारकावे तुमच्या लक्षात येणार नाहीत. आता हे खरंच आहे की मी १९५७ पासून भरपूर संधी मिळाली असूनही कोणाही गुरूच्या पाठीमागे धावले नाही. इतर शास्त्रांप्रमाणेच संगीतातही स्थित्यंतरे होत आहेत हे खरं.

आता जीवनही जास्त गतिमान झालं आहे, व्यापक झालं आहे. त्या गतिमान जीवनाशी सांगड घालावयाची म्हणजे संगीतही व्यापक झाले पाहिजे. 'सौंदर्यवादी' झाले पाहिजे. सौंदर्य कशाला म्हणावयाचे? गाण्यातील सौंदर्य म्हणजे स्वरांची असलीयत, लयीचं भान आणि तालाचं बंधन ह्या तिन्ही गोष्टी सांभाळून ज्याला हवं तसं ते गाणं भासेल. अनेक प्रसंगी अनुभवलेल्या भावनांनी सुरांचा आकार

घेतला तर तो असाच भासला असता. असा वाटावयास लावणं म्हणजे सौंदर्य निर्माण करणं असं मी समजते. सुरांची आवश्यक आंदोलनं करून, विवक्षित रचना करून हवा तो भाव, हवी ती चमत्कृती, रागाची मूळ चौकट शाबूत ठेवून करणं शक्य आहे. आपल्या मनातील सुखदु:खाच्या भावनांचं प्रतिबिंब गाण्यात पडेल तेच आपले म्हणून 'व्यक्तिमत्त्व' घेऊन उभं राहील ह्या विचाराची मी आहे. घराणी हा परंपरानिष्ठ प्रकार आहे. घराण्याच्या सीमारेषा आता पुसट झाल्या आहेत. व्हावयासच पाहिजेत. कारण घराणी घराणी तरी कोठून आली ? आपलं अभिजात संगीत म्हणजे तरी अखेर काय ? जे स्वभावत: फुलतं, आपोआप आकाराला आलं ते, जे निसर्गातून जन्माला आलं आणि अणू रेणूत विखुरलं ते. वेळची वनं गानात. झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्यांचं श्रवणीय गीत, कोकिळेचा पंचम, श्रावणसरींची लय आणि स्वर, मेघांचा गडगडाट हे सर्व अभिजात संगीतच नव्हे का ? आणि अखेर माणूसही निसर्गाचाच. मग त्याच्या मनोव्यापाराचं, भावविश्वाचं दर्शन संगीतातूनच घडलं पाहिजे तरच ते अभिजात संगीत म्हणता येईल. संगीत वातावरणात भरून राहिलेले होते. फक्त ते माणसाला उशिरा ऐकू आलं. ते ऋषीमुनींच्या वेदवाणीत दडलं होतं. पशुपक्ष्यांच्या आवाजात, सळसळ करणाऱ्या वृक्षवेलीत, फोफावणाऱ्या वाऱ्यात, एकावर आदळणाऱ्या सागराच्या लाटात, जळी, स्थळी, पाताळी संगीत भरून राहिलेले आहे. माणसानं त्याचा अभ्यास केला.- कोणी सूर घेतला कोणी ताल घेतला, लय घेतली. आपआपल्या पद्धती बनविल्या. त्याची घराणी झाली. गायकीला साचेबंदपणा आला. तो मोडला पाहिजे. गाणं 'विमुक्त' व्हावयास पाहिजे म्हणून मी ज्या ज्या घराण्यात चांगले आहे, सौंदर्यपूर्ण आहे ते ते घेईन. किराण्याची आलापी, जयपूर घराण्याच्या ताना, आग्रा घराण्याच्या बोलताना, आणि पतियाळा घराण्याच्या 'सरगम' नि मी माझं गाणं फुलवीन. माझ्या रेडिओच्या नोकरीमुळे मला अनेक कलाकारांशी चर्चा, वादविवाद करून संगीतात येणारे हे नवविचार पचविता आले. आज टेपरेकॉर्डिंग, ध्वनिमुद्रिका ह्यांचे एवढे भांडार उपलब्ध आहे की जे गुरुमुखातून शिकण्यासारखं आहे ते मी ही साधनं मला हवं तेव्हा आणि पाहिजे तितका वेळ वापरून शिकू शकते. विचार करू शकते. कोठे अडलेच तर पाहिजे त्या कलाकाराली चर्चा करून मला माझे विचार पक्के करता येतात. एकदा एखाद्या रागासंबंधी माझे विचार पक्के झाले की मी त्यावर मेहनत करून त्यात न दिसणारी सौंदर्यस्थळेही शोधून काढते. माझ्या गुरूंची—सुरेशबाबूंची – शिकवण मला ह्या कामी निश्चित उपयोगी पडते. म्हणून माझे कोणापासून प्रत्यक्ष संथा घेण्यावाचून मुळीच अडत नाही. मी गात असलेल्या बहुतेक बंदिषी माझ्याच असतात. त्यांचा चेहरा मोहरा, तुम्ही म्हणता त्याप्रमाणे एखाद्या पुराण पंडिताच्या कलाकृतीसारखा दिसत असला तर मी म्हणेन माझा यत्न सफल झाल्याची ती पावती आहे. त्यात कमीपणा कसला ?

आता 'जोगकंस' हा राग गाताना मूळ रचनाकाराला अभिप्रेत असलेल्या ह्या रागाव्यतिरिक्त काही 'जागा' मी घेते, त्या 'जागा' तुम्हाला खटकतात. कारण तुम्ही "सुघर भर पायो" ह्या पलीकडे ऐकून घ्यावयास तयार नसता म्हणून. ह्या रागाचे जनक कै. पं. जगन्नाथबुवा पुरोहित ह्यांचा असा निश्चित दावा नव्हता की मी म्हणतो त्या पलीकडे आणखी काही सौंदर्यलेणी ह्यावर घालताच येणार नाहीत म्हणून तो संपूर्ण परिपूर्ण आहे म्हणून. मग या रागातील जोड रागांच्या (जोग आणि चंद्रकंस) भिन्नभिन्न प्रकृतिला साजेशी लेणी मी माझ्या विचारांनी आणि मेहनतीनं त्यावर चढविली तर त्यात बिघडलं कुठं? रागाची मूळ चौकट पक्की आहे तिला धक्का न लावता प्रत्येक गायकानं आपआपल्या कुवतीप्रमाणे त्याला नटवावा हा तर माझ्या गुरूचा मंत्र. म्हणून तर प्रत्येक वेळी हा राग गाताना मी त्यात नवे नवे गहिरे रंग भरू शकते आणि रसिक श्रोत्यांची दाद घेते. मला नाही वाटत ह्यामुळे त्या रागाच्या एकसंधी, एकजिनसी स्वरूपाला कोठे धक्का लागत असेल. आता अशा गाण्याला तुम्ही 'मनस्वी' म्हणणार असाल तर खुशाल म्हणा.'

वरील विवाद्य विचार शास्त्रीपंडितांच्या चर्चेचा विषय म्हणून बाजूस सारला तर प्रभा अत्रे ह्यांची गायकी नितांत सुंदर आहे, सुरेल आहे, क्वचित आक्रमक आहे, श्रोत्यांना खिळवून टाकणारी आहे हे कबूल करावयास हवं. त्यांच्या मूलतः मुलायम व निकोप आवाजाला मेहनतीनं झार आली आहे, धार आली आहे– गाण्यात निरनिराळे ढंग आणि रंग भरून मैफल जिंकण्याची त्यांची हातोटी वाखाणण्याजोगी निश्चित आहे.

मी माहीमच्या त्यांच्या मालकीच्या फ्लॅटवर त्यांना भेटावयास गेलो तेव्हा दारावरची 'प्रभा अत्रे B. A. LL. B. ही पाटी वाचून जितका आश्चर्यचकित झालो नाही तितका त्यांच्या सुंदर, सुशोभित दिवाणखाना पाहून झालो. सुंदर, मऊ गाद्या असलेले कोच, दिवाण, दरवाजे-खिडक्यांचे शोभिवंत पडदे, भिंतीच्या रंगाशी त्यांची रंगसंगती, एकंदर कलात्मक सजावट, कोणत्याही सुखवस्तू कुटुंबातील गृहिणी आलेल्या पाहुण्याला आत घेण्याकरता दाराची कडी काढून आदबशीर उभी राहील तशीच प्रभा अत्रे ह्यांची मूर्ती मला दिसली.

आज प्रभा अत्रे ह्यांना कशाचीही कमतरता नाही. व्हावं तितकं नाव त्यांनी मिळवलं आहे. स्वतःच्या हिंमतीवर आणि गाण्यावर भरपूर पैसा मिळविला आहे. पुण्यास संभाजीपार्कसमोर अत्रे घराण्याची वास्तू 'स्वरप्रभा' डौलानं उभी आहे. मुंबईत स्वतःचा फ्लॅट आहे. दाराशी नवी कोरी फियाट उभी आहे. तरी त्या म्हणतात 'गाणं हा पेशा म्हणून मला आवडत नाही.'

आता मला ह्याचं आश्चर्य वाटत नाही.

आमची मराठी स्त्री ही कर्तृत्वानं कितीही मोठी झाली तरी प्रथम स्त्री असते. गृहिणी म्हणूनच जगण्यात जास्त आनंद मानणारी असते.

प्रभा अत्रेही ह्याला अपवाद नाहीत.

◻ ◻ ◻

पुस्तके

केशव मेश्राम

# मृदंगी

श्री. द्वारकानाथ प्रल्हाद शेंडे या कवीचा ऐंशी कवितांचा हा संग्रह. ‘ कोंब ’ या पहिल्या कवितासंग्रहानंतर ‘ १९६६ ते जुलै १९६९ पर्यंतच्या तीन वर्षांच्या कालमुदतीत ’ आपण केलेली वाटचाल ‘ मृदंगी ’त वाचकांना दिसेल असे कवीनेच हृद्गतात नोंदले आहे. मराठीतील एक ज्येष्ठ कवी श्री. बा. भ. बोरकर यांची आशीर्वादपर पाठराखण ‘ मृदंगी ’स लाभली आहे. ‘ मूळ मराठी पिंडाशी इमान राखणारी कविता ’ असे बोरकरांनी ‘ मृदंगी ’चे कौतुक केले आहे.

‘ मृदंगी ’मधल्या कविता वाचल्यानंतर रसिकमनावर सर्वप्रथम होणारा संस्कार कुठला असेल तर तो हा की, श्री. शेंडे यांना अद्यापही ‘ स्वतःचे स्वतंत्र विश्व ’ गवसले नाही. बोरकर, तांबे, यशवंत आदी पूर्वकवींचे साद-पडसाद त्यांच्या कवितात फार मोठ्या प्रमाणात आढळतात. ‘ मृदंगी ’मधील कविता अनुकरणाच्या प्राथमिक अवस्थेतून अजूनही सुटत नाही. पण अनुकरण जें आहे तें मात्र वेधक आहे हे देखील आरंभीच नमूद करावे लागेल. विषय, आशय, रचनाबंध, प्रतिमासृष्टी, प्रतीकरचना, नादपूर्ण शब्दांचे कवीला असणारे आकर्षण, शब्दकथेच्या काही खास लकबी आणि परंपरास्वीकार इत्यादी अनेक बाबतीत श्री. द्वारकानाथ शेंडे यांनी केलेले ‘ सफाईदार अनुकरण ’ जाणवल्याशिवाय राहत नाही.

कवीच्या अनुभवसृष्टीत साधकाची नम्रता आहे. सृष्टिनियंत्रकाच्या अज्ञात अस्तित्वाबद्दलचा प्रगाढ विश्वास आहे. प्रापंचिकाला येणारे स्त्रीविषयक-सखीविषयक विविध भावान्वेषण येथे आहे. निसर्गाच्या विविध विभ्रमांची कलावंताच्या भावजीवनावर होणारी प्रतिक्रिया त्यांनी सुजाणतेने टिपली आहे तर पारंपारिक पद्धतीने सांगितलेले भारतीय तत्त्वदर्शनही त्यांच्या ‘ मृदंगी ’त आले आहे. सामान्य व चांगले अशा दोन्ही घटकांची एकसारखी सरमिसळ ‘ मृदंगी ’मधील बहुसंख्य कवितात झाली आहे.

ऐंशी पृष्ठांच्या ह्या संग्रहात एकूण ऐंशीच कविता आहेत. म्हणजे खऱ्या अर्थाने एकही कविता दीर्घ नाही. बहुसंख्य कवितात त्रुटित आहेत. ह्या ‘ त्रुटित ’तेचा इतर

काहीही अर्थ लावता येत असला तरी आपल्याला जे जाणवले ते मळवाटेवरूनच जाऊन सांगण्याचा उत्कटतेने व मन:पूर्वकतेने यत्न केला आहे. त्यांच्या 'नवीन आले त्राण 'या कवितेंत म. गांधींबद्दलचे कवींचे भाव अशा तऱ्हेने प्रकट होतात.

'पुनरपि येशू आला गेला रुजवून मंत्र महान
क्रूसावर खिळल्या मानवते नवीन् आले त्राण'

'वेडा' ह्या कवितेंतही ते आपली श्रद्धाशीलता अशा शब्दात सांगताना दि... त–

'इंद्रायणीकाठी आता रुक्ष वाळूची ही फुले
गोड वेडानेच माझ्या कडी आपोआप गळे !'

'पेटता आकाश माझें' या कवितेतील कवीने हेतुपुरस्पर केलेली–

'राख झाल्या भावनाही लाज माझी राखती
चार ओळी प्राक्तनाच्या भस्म भाळी रेखिती'

'प्राक्तन, भस्म, भाळ' या शब्दांची पेरणी त्यांच्या भावुकतेचे आणि भाविकतेचेच द्योतक म्हणावी लागेल. 'ध्यास' या कवितेतदेखील अशाच रचनेचे प्रत्यंतर येते.

'यास्तव तरूबीजातून तरू नुरता उरतो मी
पट मांडून सृष्टीचा खेळत अन् बसतो मी !'

अर्थात ह्या भावुक भाविकपणाला स्वत:ची एक शक्ती आहे हे नाकारता येत नाही. ईश्वराचे अस्तित्व आहे का ? ह्या अद्यापही अनुत्तरित असणाऱ्या प्रश्नजंजाळाकडे न जाता जेव्हा श्री. शेंडे—

'कुणीतरी हवे बोलाया केवळ
केले तुला देवा म्हणून जवळ'

अशा ओळी लिहून जातात तेव्हा वरील तीव्र स्पंदनाची साक्ष पटल्याशिवाय राहत नाही.

शब्दांशी सलगी करणाऱ्या प्रत्येक कलावंताप्रमाणे कवीला कविता आणि 'श...' या माध्यमाचे जागते कुतूहल असल्याचे 'मृदंगी 'त जाणवते आणि हेच शब्दा... त करताना साध्या निवेदनात्मक पद्धतीपासून तो 'क्षर-अक्षर' द्वैताद्वैत अशा स...च्या गोष्टींचा तो वापर करताना दिसतात.

'क्षरांच्या उबेत जोवरी अक्षर शब्द लोकोत्तर अंकुरती
क्षराचा अक्षरा याचसाठी हेवा वाटे जन्म घ्यावा त्याच्या पोटी'

असा सर्वमान्य रूढ रीतीने जसे त्याचे 'शब्दवेड' प्रकट होते त्याप्रमाणे हाच अनुभव ते काव्यात्मतेनेही साकार करतात. त्यावेळी त्यांचे शब्द अधिक भावसघन वाटतात.

'दीस पीसतांना असे
जिणे जागरणा आले '

हीच छटा 'अभंग' माध्यमातूनही श्री. शेंड्यांनी रंगविली आहे. निर्मितीचा क्षण टिपतनाचे त्यांचे—

'नव्हते जे माझ्या ध्यानी मनी स्वप्नी
त्याचा झालो धनी निमिषात
उमलले पायी ओथंबून जग
सुखें अंतरंग फुटो आले ! '

हे शब्द आणि अखेरची 'सुखे अंतरंग फुटो आले' ही ओळ तर 'शेवटचा दिस गोड व्हावा' या तुकारामोक्तीशी सलगी करण्याइतकी जिवंत व खरी वाटते.

ह्या भावजीवनाबरोबर व्यवहाराचा आणि निसर्गचेष्टितांचा आशय श्री. शेंडे यांच्या 'मृदंगी'तून प्रस्फुरित झाला आहे. पैकी निसर्गरेखनामध्ये त्यांचे 'पाठीराखे' कविवर्य बोरकर यांच्या सिद्धहस्त शैलीची इतकी छाया कवीवर पडली आहे की शेंड्याच्या ओळी बोरकरांच्या ओळीत सहज मिसळून टाकाव्याशा वाटतात. वानगीदाखल—

'अशाच वेळी नयनी नकळत जळ भरितीचे चढते ग ! '

किंवा

'मेघरूप गंधर्व प्रकटता गगनाच्या प्रांगणी
स्वर धारांचे कवळू बघते मन माझे रंगुनी '

अशा कितीतरी जागा दाखवता येतील.

अनुकरणाचा आणखी एक दुष्परिणाम श्री. शेंडे यांना टाळता येणे शक्य नव्हते. त्यामुळेच पंडिती वळणाने लिहिण्याचा उमाळा त्यांना आलेला दिसतो. अशा कवितातील 'काव्य' हरवते आणि शब्दांचा 'वाट बिकट घाट' अशी खळखळ तेवढी कायम उरते. 'फुलता वसंत' ही कविता तर त्यामुळेच हास्यास्पद वाटते.

'वेढिलासा दिसे मिलिंदे माकंद
मरंदे माखले मृत्तिकेचे अंग ! '

ह्या ओळी पांडित्याच्या भ्रष्ट नकलेतूनच आल्या आहेत.

श्री. द्वारकानाथ शेंडे काही कवितात रचनेचे नवनवीन प्रयोगही करण्याचा प्रयत्न करतात. 'हजार व्याप', 'इथेतिथे', 'व्यवहारापैल' आणि 'रक्ती रुजुनी उन्हे' ह्या चार कवितात हे प्रकर्षाने जाणवते. एखादे पारंपारिक रूपक निवडून तेंच थोड्याफार फरकाने ठिकठिकाणी वापरण्याचाही त्यांना छंद आहे. 'आकाश-माती यांच्या मीलनाचे प्रसूती आणि नियतीचक्राचे रूपक त्यांनी 'हातीपायी',

'दार सोडवेना तरी', 'पंखी आकाश झेलती' आणि 'माझी मोरपंखी कळी' या चार कवितात राबवले आहे.

'कोंभ' आणि 'मृदंगी' हे दोघ संग्रह निघाले तरी एक अक्षम्य अशी नवथर लकब श्री. शेंडें यांना वेढून राहिलेली दिसते आणि ती म्हणजे नामधातूंचा व कृदन्ताचा त्यांनी केलेला हास्यास्पद आणि पोरकट वापर. एखाददुसरा असा अपवादात्मक उपयोग शब्दांच्या अस्फुट सामर्थ्याचे प्रकटन करण्यास कारणीभूत ठरतो, पण असे काही लिहिणे म्हणजे केवढे 'अल्पाक्षररत्व' अशी चुकीची समजूत कवीच्य मनात ठाण मांडून बसली असावी असा निष्कर्ष त्यांनी उपयोजिलेल्या— मृदंगते, सादाविती, कुबेरले, गंधाळून, सादते, तृप्तली, पहाटते, गंधल्या, अन्तराला, कोंभावेह आभाळल्या— असंख्य नामधातूंवरून काढावा लागतो.

अनुकरणाच्या मोहातून, शब्दांच्या हव्यासातून आणि कृत्रिम डागडुजीच्या अलंकरणातून सुटल्याशिवाय श्री. द्वारकानाथ शेंडे यांच्या कवितेला स्वत्व आणि कवितापण लाभणार नाही आणि ही कोंडी फोडणे ही काही त्यांच्या आवाक्याबाहेरची गोष्ट नाही. त्यांच्या काही कवितात त्यांच्यातील 'कवी'च्या ठळक खुणा प्रतीत होतात ह्यावरून हे ठामपणे म्हणता येते.

'आलो उसवून माती
जग रेखावया हाती'

या सारखे आविष्करण काव्यानंदाने थरारून सोडते. तर—

'किती केली येथे तरी फोल कोल्हेकुई
पाळतीने मृत्यू जन्मरेषेवर राही!'

यासारख्या सरळ काळजाला भिडणाऱ्या ओळी कवीच्या अंगभूत सामर्थ्याची ग्वाही पटवितात. आपल्या लेखनावर सुजाणपणाने श्री. शेंडे आपला स्वतःचाच ज[illegible] दक्ष पहारा ठेवतील तर त्यांच्या पुढील संग्रहाने माझ्यासारख्या काव्यरसिकाल नक्कीच समाधान लाभल्याशिवाय राहणार नाही.

**मृदंगी :— द्वारकानाथ शेंडे : मांडवी प्रकाशन : पृष्ठे : ८० : किमत : ३ रुपये**



कल्पनेत जमीन-अस्मानाचा फरक आहे. दोन वेळ खाण्यास मिळाले की ग्रामीण माणूस खूष होतो. रखरखत्या उन्हाचे त्यांना काही वाटत नाही. मातीचे घर, साधे कपडे व लहानसा संसार यावर Minimum Wage ठरविले तर महिना ७५ रु. होईल (जनसंघाची किमान वेतन १५० रु. ही मागणीसुद्धा शहरी दृष्टिकोनातून केल्यासारखी वाटते). खोटी तगाई घेणे, दारू पिणे, दुसऱ्याचे शेत लुटणे, बाई पळविणे, मारझोड करणे या कायद्याने गुन्हा ठरविलेल्या गोष्टीत खेड्यातील माणसांना पाप वाटत नाही. परंपरा व खानदान यातून घडलेलं मन स्त्रीशिक्षणाला अजून विचकते मग स्त्री-पुरुष समानता, मुक्त स्वातंत्र्य गोष्टी राहिल्या दूर. परंपरा व खानदानीमुळे पाटील व बडे शेतकरी काँग्रेसचे आधार आहे. काँग्रेस सत्तेवर आहे हे 'प्रतिष्ठित' जाणतात. काँग्रेसचे नाव घराघरात माहीत आहे. काँग्रेसच्या पुण्याई-वर हे जमीनदारी मनोवृत्तीचे राजकारण करू इच्छितात.

मुख्य म्हणजे खेड्यातील लोकांना तगाई, सरकारी कर्जे, सहकारी बँक वा भू-बँकांची कर्जे काँग्रेस कार्यकर्त्यांमुळे मिळतात. दैनंदिन प्रश्नांवर हे 'प्रतिष्ठित' कार्य-कर्ते सल्ला देऊ शकतात व त्यानुसार मार्ग निघतो. सत्ता, मत्ता या कार्यकर्त्यांच्या हातात असते. सत्तेचे भय देखील यांच्याकडून असते.

अशा परिस्थितीत खेड्यातील गरीब लोकांनी, भोळ्याभाबड्या बायकांनी गायीवर शिक्के मारले तर नवल काय ? निवडणुकीपुरते या पक्षीय आंदोलनासाठी येणाऱ्या विरोधी पक्षीयांना मत देऊन घरादारांवर निखारा कोणी ठेवायचा ? खेड्यात लबाडी, दहशतवाद झाला असेल, अशक्य नाही. पण हे सिद्ध करणे कठीण. चोरी करणे हा गुन्हा नाही तर पकडले जाणे गुन्हा आहे. हा पकडा म्हणजे स्फोटक ॲटमबॉम्ब नाहीतर टीकेचे भुईनळेच.

या कठोर सत्याची जाणीव विरोधी पक्षीयांना ज्या दिवशी होईल तेव्हापासून त्यांचे बळ वाढू शकेल. भूमिहीनांचे लढे धैर्याने व शस्त्र घेऊन लढविले तेव्हा नक्षलवाद उभा राहू शकला. जमीनदार वाकू शकला. (कायदा, न्याय, निःपक्षपाती सरकारी यंत्रणा या शहरी गोष्टी खेड्यात विकृत होतात) आदिवासी लोकांच्या जिव्हाळ्यावर गोदाराणी बंड करू शकली. ही उदाहरणे कदाचित हिंसक वाटतील पण ग्रामीण पायावर द्र. मु. क. तामिळनाडूत सत्ताधारी होऊ शकला. महाराष्ट्रात शे. का. पक्ष आज काम करत आहे.

पण या सर्वांचे कार्यक्रम Negative आहेत म्हणून यश मर्यादित.

काँग्रेसकडे सत्ता आहे. संघटना आहे. जनमताचा आधार आहे. पण सत्तास्पर्धी राजकारणाच्या संस्काराने निःस्वार्थी कार्यकर्ते तयार होणें कठीण होऊ लागले. जमात-

वादी, जातीयवादी राजकारणाने गटबाजी होऊ लागली. आधुनिकीकरणाच्या क्रियेला खिळ पडली. दलित-दुर्बळ वर्गाचे शोषण चालूच आहे. हरिजनांच्या स्थितीत बदल नाही. आदिवासी पशुतुल्य जीवन जगत आहेत. समाजवादाची गंगा फक्त बड्या शेत-कऱ्यांच्या दारात वाहत आहे. हरित क्रांती यांच्या मळचात आहे. छोटे शेतकरी–भूमिहीन अद्याप मुका आहे. या काँग्रेस कार्यकर्त्यांना Alternative कोण ? खेड्याचे सामाजिक व आर्थिक मत बदलणार कोण ?

यावेळी निःस्वार्थी, सुशिक्षित, सेवाभावी व समंजस कार्यकर्ते खेड्यात जाण्याची आवश्यकता आहे. अशा कार्यकर्त्यांनी तगाई–कर्जे–बी–बियाणांबाबत सरकारी मदत मिळवून देण्यास मदत केली. शाळा चालविल्या. (मन आधुनिक करण्याची क्रिया येथेच सुरू होते. व्यायामशाळा, खेळ द्वारा संघटना बांधता येतात. हीच मुले उद्याचे कार्यकर्ते होऊ शकतात. विरोधी पक्षात गेले तरी कडवटपणा राहत नाही.) जर गावच्या सुधारणेसाठी पाण्यासाठी लागणाऱ्या पैशाच्या मागणीकरता हे कार्यकर्ते उभे राहिले तर हळूहळू गावामागून गावे उभी राहतील.

अशी ही ग्रामीण मते, शहरातील जातीय, धार्मिक, भाषिक, अल्पसंख्यांकाची मते, झोपडपट्टीतील मते, बुद्धिभेदाने फिरलेली सुशिक्षित मते याबरोबरच इंदिराजींचे आक्रमक नेतृत्व, झंझावाती दौरे, बँक राष्ट्रियीकरण व तनखेबंदी यामुळे निर्माण झालेली 'समाजवादी' प्रतिमा, गरिबी हटावमुळे समाजवादाचे प्रतीक, सरकारी यंत्रणेचा कुशलतेने केलेला वापर, बड्या आघाडीतील मारामाऱ्या व त्यांचा तत्त्वशून्य कार्यक्रम, विशेष म्हणजे 'इंदिरा हटाव.' यामुळे मिळालेला हिरॉईनच मान या अनेक गोष्टींमुळे काँग्रेसने देशभर तुफान निर्माण करून झंझावाती विजय मिळविला. या विजयाच्या महापुरात विरोधी पक्षातील नेतृत्वाचे मोठे वृक्ष कोसळले, जोपासलेल्या जागा वाहून गेल्या, ताब्यातील राज्ये कोसळली, जमातवादावर आधारलेले बुरूज कोसळले. जगजीवनराम अध्यक्षतेखालील व इंदिरा गांधी नेतृत्वतेखालील नवकाँग्रेसने दोनतृतीयांशावर जागा मिळविल्या. आज–

मुल्क काँग्रेसका, नाम जगजीवनरामका और अंमल इंदिराजीका असला तरी उद्या–

मुल्क काँग्रेसका, नाम समाजवादका और अंमल राणी इंदिराका पाच ७२ राहणार आहे.

# रंगभूमी

मराठी साहित्यसंघाचे नवे नाटक

## रा त रा णी

मुंबई मराठी साहित्यसंघाच्या नाट्यशाखेचे नवे नाटक सौ. विजया मेहता दिग्दर्शित करीत आहेत असे कळले त्यावेळी साहजिकच त्याविषयी विशेष कुतूहल निर्माण झाले. ' रंगायन 'च्या रूपाने विजयाबाईंनी केलेली कामगिरी महाराष्ट्रातील प्रायोगिक रंगभूमीच्या इतिहासात फार मोलाची आहे. परंतु विजयाबाईंसारख्यांच्या अभिजात दिग्दर्शनाचा लाभ व्यावसायिक रंगभूमीला झाल्याखेरीज महाराष्ट्रातील प्रायोगिक रंगभूमीच्या श्रेयाचे संस्कार व्यावसायिक रंगभूमीवर होणार नाहीत. मुंबई मराठी साहित्यसंघाच्या वतीने बऱ्याच वर्षांनी विजयाबाईंनी पुन्हा एकदा व्यावसायिक रंगभूमीवर केलेले हे पदार्पण स्वागतार्हच होय.

' रातराणी ' या नाटकाचे लेखक पद्माकर गोवईकर हे मराठी नियतकालिकांच्या वाचकाला फारसे अपरिचित नाहीत. परंतु मला वाटते हे त्यांचे पहिलेच नाटक आहे. हे नाटक स्वतंत्र नसून तरुण रॉय या बंगाली नाटककाराच्या नाटकाचे रूपांतर आहे असे म्हटले जाते. [ परंतु प्रयोगाच्या वेळी (प्र. क्र. २) तसा उल्लेख केला गेला नाही. ] अर्थात गेल्या दोन वर्षांत मराठी रंगभूमीवर लोकप्रिय ठरलेल्या बादल सरकारांच्या नाटकापेक्षा प्रस्तुत नाटकाचा विषय वा रचना अगदी वेगळी आहे. तसे पाहिले तर सांकेतिक अर्थाने आपण ज्याला बंगाली (भावविवश) म्हणतो या पद्धतीचे हे नाटक आहे.

हे नाटक आहे–हंसा चौबळ या सुस्वरूप, एकाकी नटीच्या व एका साध्याभोळ्या प्राध्यापकाच्या स्नेहसंबंधांचे. पण तरी ' ब्ल्यू अँजल ' या चित्रपटकथेपेक्षा फार निराळे असे. या दोघांभोवती रचलेले हे नाटक फार आटोपशीर आहे. हंसा चौबळ (सौ. विजया मेहता), प्रा. पाळंदे (दत्ता भट), राजशेखर (अनंत वर्तक), विनय वाघ (राजा बापट) ही या नाटकातली पात्रे आहेत.

आपल्या स्नेहशून्य अपमानास्पद संसारातून मुक्त होण्यासाठी घर आणि छोटा मुलगा मागे टाकून चित्रपटसृष्टीत गेलेली हंसा तिथेही अपयशी ठरली आहे. परंतु तिला त्याचे फारसे दुःख नाही. आपल्या मुलाला आपल्याविषयी काय वाटत असेल या कल्पनेने ती अणाक्षणाला उद्ध्वस्त होत असते. अशाच एका क्षणी ती गळफास लावून घेण्याचा प्रयत्न करते. तो फसतो आणि त्यावेळची तिची किंकाळी ऐकून

## सौ. पुष्पा भावे

रस्त्याने जाणारा एक गबाळा प्राध्यापक घरात येऊन तिला धीर देतो. या अपघातातून एका निर्भर स्नेहाचा प्रारंभ होतो. हंसाचा एकेकाळचा प्रियकर आणि दिग्दर्शक राजशेखर या प्राध्यापकाच्या भोळ्या स्वभावाचा आणि हंसावर नितांत प्रेम करणाऱ्या विनय वाघ या कोवळ्या तरुणाचा फायदा घेऊ पाहतो. हंसा या दोघांना वाचवू पाहते, पण शेवटी साधाभोळा वाटणारा प्राध्यापकच विनयला आणि स्वतःला वाचवतो. प्राध्यापकानेही आपल्याशी अप्रामाणिकपणा केला असे ज्यावेळी हंसाच्या लक्षात येते त्यावेळी तिला आपल्या आयुष्यातले एकुलते एक श्रेय लुटले गेले असे वाटते. परंतु प्राध्यापकांनी अखेरच्या अंकात सांगितलेल्या कथेतून तिला त्यांच्या निर्व्याज मनाची ओळख पटते. ही कथा सांगत असताना प्राध्यापकाने आपली तुलना पहिल्या प्रेमासाठी आत्मघात करणाऱ्या त्यांच्या प्रेयसीशी केली या एका गोष्टीमुळे तिला आपल्या पापाचे परिमार्जन झाल्यासारखे वाटते. तेवढ्यात विथरलेल्या राजशेखरने हंसाच्या मुलाला तिच्याविषयी वेडेवाकडे पत्र लिहिले असल्याचे तिला कळते. त्यामुळे आपल्या मुलाच्या अश्रूसाठी ती सुखाने मृत्यूला सामोरी जाते. या नाटकाचे संवादलेखन अत्यंत दोषास्पद असे आहे. बऱ्याच ठिकाणी लेखकाने आपल्या हौसेखातर योजलेले वाङ्मयीन संदर्भ अप्रस्तुत असल्यामुळे (Dream Children चा अपवाद वजा करता) कृत्रिम झाले आहेत. संविधानकाची रचना मात्र पहिल्या नाट्यलेखनाच्या तुलनेने नेटकी आहे. नाटक जेथे सुरू होते तिथून एक आवर्तन घेऊन पुन्हा परत तेथेच संपते.


या नाटकाचा प्रयोग पाहत असताना जे स्वारस्य निर्माण होते ते सौ. विजया मेहता आणि दत्ता भट यांच्या अभिनयामुळे. अगदी वेगळ्या स्वभावाची वाटणारी, दिसणारी दोन माणसे एकाच अतृप्तीमुळे निर्मम स्नेहाच्या भूमिकेवर एकत्र कशी येतात याचे अत्यंत सूक्ष्म दर्शन विजयाबाई आणि दत्ता भट यांनी घडविले. विशेषतः, या दोघांच्या वागण्यातील खऱ्याखोट्याच्या मिश्रणाची जाण ज्या पद्धतीने त्यांनी प्रेक्षकांपर्यंत पोचवली ते विशेष होते. दत्ता भट या नटाच्या अभिनयाचा एक साचा होतो आहे असे अलीकडे वाटू लागले होते, तोच या भूमिकेत आपल्या आवाजाचा अगदी वेगळा वापर करून त्यांनी प्रेक्षकांना सुखद धक्का दिला

आहे. विजयाबाईंच्या अभिनयामध्ये–विशेषतः आत्महत्येचा प्रयत्न फसल्यानंतरच्या यांच्या मूकाभिनयात–त्यांच्या नेहमीच्या कौशल्याचा प्रत्यय आला. स्नायूंवरच्या ताणात त्या इतका फेरबदल करू शकतात की पहिल्या अंकात त्या ओढलेल्या, कृश दिसत होत्या तर दुसऱ्या व तिसऱ्या अंकांतील त्यांच्या काहीशा स्थिरवृत्तीचे प्रत्यंतर जरा सुखावलेल्या शरीरातून येत होते; किंबहुना असे म्हणता येईल की, मूळ संहितेत नसलेली व्यक्तित्वसंपन्न पात्रे विजयाबाई व दत्ता भट यांच्या अभिनयामुळे लक्ष्यवेधक झाली आहेत.

अनंत वर्तक यांची राजशेखरची भूमिका फारशी वठली नाही; परंतु सांकेतिक खलनायकासारखा भडक अभिनयही त्यांनी केला नाही. राजा बापट यांनी आपले लहानसे काम समजून मेहनतीने केले होते.

सर्व खोल्या एकदम दिसतील अशी वेगवेगळ्या स्तरांत केलेली नेपथ्यरचना प्रयोगाच्या दृष्टीने फारच पथ्यकारक ठरली. हंसाच्या घरात लावलेली दोन चित्रे मात्र तिच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार करतील अशी वाटली नाहीत. तिचे या नाटकातले व्यक्तिमत्त्व अमूर्त चित्रकला आवडेल असे सोफिस्टिकेटेड वाटत नाही. विजयाबाईंनी दिग्दर्शनामध्ये, विशेषतः चालचालींच्या रचनेत, या विविध स्तरांचा योजकतेने वापर केला आहे.

खरं म्हणजे हा प्रयोग पाहत असताना, मराठीतल्या या अभिजात नट-नटी, दिग्दर्शकांचे हे परिश्रम काहीसे अनाठायी आहेत याची जाणीव होत होती. नटीच्या जीवनातल्या दुःखाविषयीच्या सांकेतिक भावविवशतेतून उभे राहणारे नाटक, दीर्घ स्पष्टीकरणातून प्रस्थापित केलेले 'रातराणी' हे शीर्षक सारेच विजयाबाईंच्या कुवतीपेक्षा फार खुजे आहे याची जाणीव होत होती. मराठी रंगभूमीवर आज समर्थ दिग्दर्शक, नट–नटी, नेपथ्यकार आहेत. फक्त त्यांच्या कर्तृत्वाला आव्हान देईल असा नाटककार नाही, ही खंत अधिक तीव्र झाली.



पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

# अंदाज

२७ मार्च ते २ एप्रिल १९७१

**मेष** : शरीर प्रकृती चांगली राहील. धनस्थानाची स्थिती चांगलीच राहील. भावंडांकडून व मामाकडून सर्व बाबतीत मदत होईल. प्रवास योग घडेल. त्यात पराक्रमाला वाव मिळेल. घरात धार्मिक समारंभ घडेल. सरकारी कामे लांबणीवर टाकावी. रविवार सोमवारी मनाविरूद्ध गोष्टी घडतील. व्यवहारात घोंटाळे निर्माण होतील. मित्रांकडून फसवणूक होण्याचा योग आहे.

विद्याभ्यासात संपूर्ण अपयश. सरकारी शाळा-कॉलेजातील कार्यकर्त्यांना त्रासदायक दिवस आहेत. भागीदार व पत्नीं सर्वप्रकारे उपयोगी पडतील. अचानक धनलाभ होईल. पत्नीच्या सल्ल्याप्रमाणे वागल्यास कामात यशप्राप्ती होईल. वाहतुकीची कामे, यात्रा सहली करणारांना मनासारखे काम मिळेल. उद्योगधंदा चांगलाच चालेल. ३६ ते ४२ या वयातील व्यक्तींना प्रगतिपर दिवस आहेत. शुभ तारखा ३०।३१।१।२.

**वृषभ** : शरीरप्रकृती चांगलीच राहील. स्थावर मालमत्तेचे पैसे हातात पडतील. सरकारकडून घरासंबंधी चालू असलेल्या प्रकरणातून चांगलीच धन प्राप्ती होईल. प्रवासयोग येईल. घरात सामाजिक कार्य करण्याची तयारी होईल. एखाद्या अशा कामात प्रत्यक्ष भाग मंगळवार-बुधवारी घ्यावा लागेल. विद्याभ्यासात संपूर्ण अपयश येईल. मानमान्यतेला कमीपणा येईल. प्रवासात वस्तू हरवण्याचा योग आहे. प्रवास टाळावा हा योग गुरूवारी येण्याचा योग आहे. धंदा व्यवसायात शिस्तवार माघार घ्यावी लागेल. सप्तमातील गुरू व एकादशातील रवी यांचा ९।५ योग शेवटी सर्व संकटातून मुक्त करील. सरकारकडून संपूर्ण मदत मिळेल. शुभ तारखा २७।३०।३१।१।२

**मिथुन** : शरीर प्रकृती चांगलीच राहील. घरात आनंदीआनंद नांदेल. गुरुवार-शुक्रवारी घरात कुटुंबातील नातलग मंडळींचा मेळावा शुभकार्याकरता एकत्र येईल. धार्मिक कार्याकरता पैसा खर्च होईल. अचानक धनलाभ होईल. घराच्या जागेसंबंधी अडलेली सरकारी कामे पूर्ण होतील. घर बांधण्याची सुरुवात करण्याला दिवस चांगले आहेत.

विद्याभ्यासात संपूर्ण यश येईल. विद्येमुळे मानमान्यता वाढेल. विद्या व्यासंगी व्यक्तींना दिवस प्रगतिपथावर नेणारे आहेत. संततीची भरभराट होण्याचा योग आहे. सरकारी नोकरीत असलेल्यांना मोठ्या हुद्यावर नेमणूक होण्याचा शुभयोग आहे. ३२ ते ३६ वयातील व्यक्तींना हा योग निश्चित होईल. व्यापार धंदा चांगलाच चालेल. सर्वबाजूंनी प्रगती होईल. शुभतारखा २६।२७।२८।१।२.

**कर्क** : शरीरप्रकृती उत्तम राहील. वडिलार्जित स्थावर मालमत्तेचे कोर्टातील कामाचा निकाल मनासारखा लागून पैसा हातात पडेल. या राशीची माणसे सार्वजनीक कार्यकर्ती असतात. सार्वजनीक कामात संपूर्ण यशप्राप्ती होईल. मात्र या कामात घरातील माणसे आणि मित्र यांचाच विरोध जास्त सोसावा लागेल.

विद्याभ्यासात चांगलीच प्रगति होईल. शत्रूचा संपूर्ण पराजय होईल. एजंटचे काम करणारांना भरपूर काम मिळेल व त्यात धनलाभही चांगला होईल. भागीदार व पत्नीकडून जरा तुटक वागणूक होईल. २७ ते ३२ वयातील व्यक्तींना प्रेम प्रकरणात गुंतून पडण्याचा योग आहे. शुभ तारखा २७ ते ३१.

**सिंह** : शरीर प्रकृती चांगली राहणार नाही. शनिवार, रविवार, सोमवारी जरासे उष्णतेचे विकार होण्याचा अगर प्रत्यक्ष ताप येण्याचाही संभव आहे. पैशाची अडचण येणार नाही. भागिदारांकडून व सासुरवाडीकडून संपूर्ण मदत होईल. घरात


## अक्षरपद्धती, कुटुंबनियोजन आणि कुटुंबसुयोजन

अनैतिक साधने न वापरता मनोवांच्छित संतती होईल. सुयोजनकरता पाळावयाचे दिवस, महिने, चंद्र वगैरेंचा तक्ता उपयोगाच्या माहितीसह रु. १०/– व नियोजनाचा तक्ता रु. ५१/– शिवाय त्यावर Astro-Medical उपाय सांगू. याशिवाय वर्षफल रु. १०/– विवाह प्रश्न रु. १०/– व इतर सर्व कामे केली जातील. भेटण्याची वेळ सकाळी ८ ते ११

**पं. वि. म. जोशी, ज्योतिष विशारद**
**"गीताप्रसाद" आऊट हाऊस, कर्वे रोड, पुणे नं. ४.**

संपूर्ण सहकार्य व सुखसमाधान नांदेल. घरासंबंधी भिजत पडलेले प्रश्न मंगळवार-बुधवारी मनासारखे सुटतील.

विद्याभ्यासात संपूर्ण यश. गुरू-मंगळांचा अन्योन्ययोग फार चांगला आहे. शत्रुनाश होईल. व्यापार धंदा चांगलाच चालेल. कापड, फॅन्सी, माल, प्रसाधनांचा व्यापार करणारांना अनपेक्षित धनलाभ घडेल. हातात घेतलेल्या प्रत्येक कामात यश येईल. शास्त्रज्ञांना जगापुढे येण्याचा शुभ योग आहे. सर्व सप्ताह शुभफलदायी आहे.

**कन्या :** शरीर प्रकृती चांगली राहणार नाही. ३२ ते ३६ वयातील व्यक्तींना धंदा व्यवसायात अचानक नुकसान येऊन त्या धक्क्यांनी आजारी पडण्याचा योग आहे. पैसाअडक्याच्या व्यवहारात हातून अनेक चुका होण्याचा योग आहे. भावंडां-कडून मदत होईल. गुरू-रवी ९।५ योग अडचणीतून पार पाडील. सरकारी कामात अपयश येणार नाही.

विद्याभ्यासात संपूर्ण अपयश येईल. अभ्यासक्रमात अनपेक्षित अडचणी निर्माण होतील. संतती अत्यंत वाईट रीतीने वागेल. सरकारी नोकरीत असलेल्या ३६ ते ४२ च्या अधिकाऱ्यावर फौजदारी गुन्ह्याचे आरोप येण्याचा दाट संभव आहे. मंगळ-वार बुधवारी हा योग आहे. सर्व सप्ताह शुभफलदायी आहे.

**तूळ :** शरीर प्रकृती साधारण नरमच राहील. 'थकवा आल्यासारखा वाटेल. आर्थिक परिस्थिती चांगलीच राहील. गुरू-मंगळाचा अनन्योयोग पराक्रमावर पैसा मिळवून देईल. घरात थोडासा मतभेद होईल. भागीदार नीट वागणार नाहीत. पत्नी आजारी पडण्याचा योग आहे.

विद्याभ्यासात— विशेषत: शेतकी अगर शास्त्रीय विषयात जास्त प्रगती होईल. शिक्षक, लेखक, ज्योतिषांचा अभ्यास करणारांना दिवस जास्त चांगले आहेत. व्यव-साय धंदा साधारण चालेल. सरकारी कामात संपूर्ण यश येईल. शत्रूनाश येईल. सार्वजनिक कामात यशप्राप्ती होईल. शुभ तारखा ३०।३१।१।२.

**वृश्चीक :** शरीर प्रकृती चांगलीच ठणठणीत राहील. सांपत्तिक स्थिती फारच सुधारेल. भावंडांशी पटणार नाही. मालायोग झाला आहे. प्रत्येक बाबतीत यशप्राप्त होईल. घरात शुभ समारंभ होईल. शत्रूनाश होईल. प्रतिपक्षांकडूनही सर्वप्रकारची मदत होईल.

विद्याभ्यासात संपूर्ण यश येईल. संततीची नेत्रदीपक प्रगती होईल. बापसे बेटा सवाई म्हणण्याची वेळ येईल. विद्येमुळे पैसा व मान मान्यता दोन्ही प्राप्त होईल. धंदा व्यवसाय चांगला चालेल. बौद्धिक व्यवसायातील लोकांना सरकारची संपूर्ण

मदत मिळेल. कितीही वाईट वागले तरी लोकांकडून कौतुकच होईल. शुभ तारखा २७ ते ३१.

**धन** : शरीर प्रकृती साधारण राहील. लग्नेश व चतुर्थेश गुरु व्ययात आहे. धन स्थिती सुधारेल पण घरखर्च फारच वाढेल. घरात शनिवारी विवाहाची बोलणी होतील. गुरु सुखस्थानावर स्वगृहावर पाहतो आहे. अचानक धनलाभ होईल. सरकारी कामात यशप्राप्ती होईल.

विद्याभ्यासात यशप्राप्ती होईल. व्ययापासून पंचमापर्यंत सर्व ग्रह आहेत. मालायोग झाला आहे. अनपेक्षित मानसन्मान मिळेल. इतके दिवस केलेल्या अमाप कष्टाचे चीज होईल. उद्योग धंद्यात प्रगतीकारक वाढ होईल. भावंडे मदत करतील.


**निष्ठा आणि प्रेम विरुद्ध मोह आणि हाव**

यामधील संघर्षाची कथा

**आर. आर. के. कम्बाईन्स कृत**

# लगन

दिग्दर्शक — रामन्ना

संगीत — लक्ष्मीकांत प्यारेलाल

निर्माता — रामस्वरूप, ई. बी. राजन, कैलास चोप्रा

नूतन, अजय सहानी, प्रेम चोप्रा, फरीदा जलाल, बिंदू, सुलोचना, शबनम, नझीर हुसेन, जगदीप

**नाझ**, २॥, ६, ९। **रेक्स** ११॥, २॥, ६, ९। **लोटस** ११॥, २॥. ६, ९। **पॅलेस** ११॥, २॥, ६, ९।

**रूपम** २॥, ६, ९। **सिटीलाईट** ११॥, २॥, ६, ९। **हिंदमाता** ११॥, २॥, ६, ९। **नंदी** (वांद्रे) **नवरंग** (अंधेरी) **संगम**

**अनुपम** (गोरेगाव), **न्यू इरा** (मालाड) **अजंठा** (बोरिवली), **सहकार** (चेंबर), **आकाश** (कुर्ला), **उदय** (घाटकोपर), **अशोक** (ठाणे), **अमन** (उल्हासनगर)

— डीलक्स प्रकाशन —

भागिदार नीट वागतील. मित्रांकडून पराक्रमाला मदत होईल. सर्व सप्ताह शुभ फलदायी आहे.

**मकर :** शरीर प्रकृती चांगली राहणार नाही. हट्टीपणा वाढेल. मानसिक त्रास फार होईल. अचानक प्रवास योग येईल. शनिवारी काही घराविषयी महत्त्वाचे काम करावे लागेल. गृह सौख्यात व्यत्यय येईल. घरात मात्ता अगर मातुल घराण्यातील वृद्ध गृहस्थ आजारी पडण्याचा योग आहे. ३२ च्या पुढील वयाच्या माणसाना हा अनुभव रविवारी-सोमवारी येईल.

विद्याभ्यासात प्रगतीकारक दिवक जातील. शास्त्रीय ज्ञान शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना दिवस चांगले जातील. अचानक धनलाभ होईल. भागीदार चांगले वागतील. गुरु-मंगळाचा नवम दशमातला अन्योन्य योग शुभ फलदायी आहे. भाग्य आणि मोठेपणा एकदमच हातात पडतील. व्यापार धंद्यात पैसा प्राप्त होईल. फॅन्सी मालाचे व्यापारी खुप पैसा हातात पाडून घेतील.

**कुंभ :** शरीर प्रकृती चांगलीच राहील. एकच एक राजयोगकारक ग्रह शुक्र लग्नी आहे. तो सुख व भाग्योदय वाढवील. हा अनुभव २७ ते ३२ वयातील व्यक्तींना जाणवेल. धनस्थानाची स्थिती चांगलीच सुधारेल. धनेश व कारकेश गुरु स्वग्रहावर दशमातून ९ दृष्टीनी पाहात आहे. प्रवास योग बौद्धिक कामाकरता येईल. रविवार सोमवारी हा योग येईल.

विद्याभ्यासात यश येईल. संततीचा उत्कर्ष होईल. संततीची वर्तणूक चांगली राहील. शत्रूकडूनसुद्धा सर्व बाबतीत मदत होईल. पत्नीकडून सर्व कामात मदत होईल. मानमान्यता वाढेल. सरकारी कामात यशप्राप्ती होईल. व्यापार धंदा चांगला चालेल. बौद्धिक व्यवसायातील व्यक्तींना दिवस प्रगती पथावर नेणारे आहेत. शिक्षक, लेखक, ज्योतिषी यांना चांगलाच धनलाभ होईल. सर्व सप्ताह शुभ फलदायी आहे.

**मीन :** शरीर प्रकृती चांगलीच सुधारेल. धनस्थिती चांगलीच सुधारेल. धनाधिपती मंगळ दशमात व कारक गुरु नवमात हा योग अचानक धनप्राप्ती करून देईल. प्रवास योग येईल. तो टाळावा. घरात काहीतरी शुभ समारंभ होईल. गुरु-रवी त्रिकोण सर्व प्रकारे पुढे येण्याला मोका आणून देतील. कापडाचे व्यापारी, मशिनरीचे व्यापारी. फॅक्टरीवाले यांना खूप प्रगतीकारक दिवस आहेत.

विद्याभ्यासात नेत्रदीपक प्रगती होईल. संततीचा उत्कर्ष होईल. सरकारी नोकरीत असलेल्या मुलांची प्रमोशनवर चांगल्या जागी नेमणुका होतील. २८ ते ३२ वयातील व्यक्तींना हा योग जोरदार आहे. आध्यात्मिक अभ्यास करण्याकडे मनाला कल होईल. मित्र मंडळींकडून फसवणूक होण्याचा योग आहे. पत्नी चांगली वागेल. भागीदारांकडून चांगली मदत होईल. सर्व सप्ताह शुभ फलदायी आहे. □ □ □

# गरिबी हटाव, पण कशी ?

तरुण माणसे केवळ बुटपॉलिश, नेकटाय
आणि फाकडे इंग्रजी यांवर दोन दोन
हजार रुपये कमवीत आहेत......

धनिक, उद्योगपती, समृद्ध शेतकरी,
राज्यकर्ते, नोकरशाही, औद्योगिक
कामगार, बुद्धिजीवी या समाजातील संघटित वर्गांची
चैनबाजी सुरू आहे...

हे असेच चालू राहिले तर समाजातील
गरीब, असंघटित वर्ग म्हणजेच अनिर्वाहक्षम
शेतकरी व भूमिहीन आणि त्यांतूनच
शहरात आलेले असंख्य बेकार यांची
काळजी कोण करणार ?—

# यांची गरिबी हटणार कशी ?

या समस्येची एक वस्तुनिष्ठ मांडणी—

## माणूस 'गरिबी हटाव योजना' विशेषांक


बुधवार, ३१ मार्च १९७१

किंमत एक रुपया

जागरूक मतदार, राजकीय-सामाजिक क्षेत्रांतील कार्यकर्ते
यांनी कृपया विशेष नोंद घ्यावी.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Biweekly ) : 40 Paise : Regd. No. M-H 649



" महत्त्वाच्या कामासाठी मला ताबडतोब दिल्लीत पोहोचायचं आहे म्हणून म्हटलं रेल्वेनं जाऊया, विमानानं नको..."